## शेटे नगरात सव्वा लाखांचे दागिने लंपास

**सोलापूर** : लक्ष्मी पूजेचे साहित्य आणण्यासाठी जुनी मिल जवळ असलेल्या सुपर मार्केट येथे गेले असताना चोरट्याने घरफोडी करत घरातील सव्वा लाख रुपये किमतीचे सोन्याचे गंठण चोरून नेले. ही घटना शेटे नगरात घडली. शिवाजी प्रल्हाद कांबळे (वय-६६,रा. तुळजाई रामचंद्र शेटे नगर,लक्ष्मी पेठ,सोलापूर) हे लक्ष्मी पूजेचे साहित्य आणण्यासाठी सुपर मार्केट येथे गेले होते. घराचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरातील १ लाख ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण चोरून नेले.मार्केट वरून आल्यानंतर ही बाब कांबळे यांच्या लक्षात आली. त्यानंतर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## रेल्वे अपघातामधील बंगालच्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : -रेल्वेच्या धडकेत जखमी झालेला सॅम्युल रॉय (वय २८ रा. मालदा, पश्चिम बंगाल) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी सकाळी मरण पावला. तो शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास आसरा ब्रिजच्या खाली रेल्वेच्या धडकेने गंभीर जखमी झाला होता. त्याला विजापूर नाका पोलिसांनी बेशुद्ध अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो रविवारी मरण पावला. मयत सॅम्युल हा बंगाल येथून गेल्या दोन वर्षापासून गायब होता. सोलापूरात फिरस्ता म्हणून फिरत होता. मिळेल ते मजुरींचे काम करीत होता.त्याच्या खिशात आढळलेल्या मोबाईल क्रमांक वरून त्याची ओळख पटली. तपास हवालदार बहिर्जे करीत आहेत.

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २५ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३५७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# अजितदादांची होतेय 'घुसमट' अर्थखात्यावरही येणार 'संकट'

## बारामतीच्या सभेतील विधानाने राजकीय चर्चेला उधाण

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची महायुतीच्या सत्तेत घुसमट होत असल्याचे चित्र समोर आले आहे. आपल्या काकांचा शब्द मोडून सत्तेत गेल्यानंतर काही दिवसातच त्यांचे पंख छाटण्याचे कारस्थान भाजप नेत्यांकडून सुरू झाल्याचे दिसत आहे. शनिवारी बारामतीच्या दौऱ्यावर आलेल्या अजितदादांमधील अस्वस्थता बाहेर पडली. विविध संस्थांच्या सभेत बोलताना त्यांनी केलेल्या एका विधानावर बरीच चर्चा होवू लागली आहे. माझ्याकडे असलेले अर्थखाते पुढे टिकेल की नाही? हे मलाच माहित होत नाहीय, असे त्यांनी भर सभेत बोलल्यामुळे त्यांच्या अर्थखात्यावर लवकरच गंडांतर येण्याची चिन्हे दिसत आहेत. काकांची साथ सोडल्यामुळे आगीतून फुफाट्यात पडल्याची त्यांची गत झाली आहे.**

भाजप नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे शनिवारी मुंबईच्या दौऱ्यावर आले होते. भाजपश्रेष्ठी आपल्या भूमीत आल्यानंतर अजितदादांनी मुंबईत थांबणे आवश्यक होते परंतु ते ताडकन बारामतील आले. मुंबईला आल्यानंतर शहा यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एक बैठक झाली. त्यात राज्यातील विविध प्रश्नांवर चर्चा झाली. त्यालाही अजितदादा अनुपस्थित होते. खरेच दादा गैरहजर होते की त्यांना टाळले गेले हा संशोधनाचा विषय आहे. भाजपचे पॉवरफुल नेते मुंबईत येऊनही अजितदादा हे बारामतीत निघून आल्याने शनिवारपासून राजकीयदृष्ट्या तर्कवितर्क लढविले जात आहेत.

अजितदादा आज राज्य सरकारमध्ये आहेत. माझ्या हातात अर्थखाते आहे, त्यामुळे आपल्याला जरा झुकते माप मिळते. पण पुढे हे टिकेल की नाही टिकेल, हे माहिती नाही. कारण पुढचे कोणी सांगितले आहे, असे आश्चर्यकारक विधान त्यांनी बारामतीत बोलताना केले. महायुतीत सहभागी झाल्यानंतर अर्थखाते त्यांना द्यायला भाजप नेत्यांनी नकार दिला होता. हे खाते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे होते.

शहा यांच्या दौऱ्याला अनुपस्थित राहण्याबाबत अजितदादांनी स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, मी बारामतीला २३ सप्टेंबर, तर पिंपरी-चिंवडला २४ सप्टेंबर आणि २५ सप्टेंबरची वेळ पुण्याला दिली होती. मी जेव्हापासून बारामतीचे नेतृत्व करीत आहे, तेव्हापासून तेथील पाच संस्था बारामती दूध संघ, खरेदी विक्री संघ, सहयोग गृहनिर्माण संस्था, बारामती बँक, बारामती बाजार समिती यांच्या वार्षिक बैठका होत्या. त्या बैठका मला चुकवायच्या नव्हत्या. मी शाह यांच्या कार्यालय भेटीला मुंबईत नसणार आहे, हे कळविले होते.



### खडसेंनी दिला दुजोरा



अजितदादा महायुतीत नाराज असल्याचे बोलले जात आहे. अजितदादांच्या त्या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. गेल्या अनेक दिवसांपासून अजित पवारांना डावलले जात आहे, अशी भावना त्यांच्या मनात दिसतेय. अजित पवार महायुतीत राहिले की नाही राहिले, हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यामुळे त्यांनी नाराजीची भावना व्यक्त केली असावी

### 'नैसर्गिक विधान, राजकीय नाही'



अजितदादांच्या विधानासंदर्भात भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी टिप्पणी केली आहे. भविष्यातील कुणालाही माहिती नसते. उद्या काय होईल. उद्याचा दिवस तुमचा माझा कसा असेल, हे तुम्हाला आणि मलाही माहिती नसते, त्यामुळे अजितदादांचे यांचे हे नैसर्गिक विधान आहे, ते काही राजकीय विधान नाही, असे बावनकुळे म्हणाले. बावनकुळे यांचे हे विधान पाहाता अजितदादांच्या अर्थखात्यावर गदा अटळ असल्याचे मानले जात आहे.

### जयंतरावांचा चिमटा



अजितदादांच्या त्या वक्तव्यावर शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजितदादांना चांगलाच चिमटा काढला.याविषयी पाटील म्हणाले, अजित पवार सावध असल्याचे मला समाधान आहे. अजित पवार स्वखुशीने सरकारमध्ये सामील झाले आहेत. अन्याय होत असल्यास अजित पवार विचार करतील.

## सख्या भावावर कुऱ्हाडीने हल्ला ; सांगोला तालुक्यातील घटना

**सोलापूर** : आम्हाला बघून कॉलर उडवता काय ? या कारणावरून कुऱ्हाड, काठी आणि दगडाने केलेल्या मारहाणीत भावकीतील एका वृद्धासह पाच जण जखमी झाले.ही घटना चिणके (ता.सांगोला) येथे शनिवारी घडली. या प्रकरणात सांगोल्याच्या पोलिसांनी चौघाजणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जखमीमध्ये महादेव जगन्नाथ मिसाळ (वय ६० ) त्यांची दोन मुले गणेश आणि विठ्ठल, दोन सुना सोनाली आणि धनश्री मिसाळ अशा ५ जणांचा समावेश आहे . यासंदर्भात महादेव मिसाळ (वय ६० ) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी जखमी महादेव यांचा भाऊ सिद्धेश्वर मिसाळ, त्याची पत्नी शारदा, दोन मुले संस्कार आणि साहिल मिसाळ (सर्व रा. चिणके) अशा चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## पुन्हा आलो, पुन्हा लढणार: रमेश कदम

सुराज्य/सोलापूर

मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार रमेश कदम हे आठ वर्षानंतर रविवारी मोहोळ शहरात दाखल झाले. त्यांच्या स्वागतासाठी हजारो तरूणांनी मोठी गर्दी केली होती. तुरूंगातून सुटल्यानंतर प्रथमच रमेश कदम मोहोळमध्ये आल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी जल्लोषात स्वागत केले. 'परत आलो, परत लढणार,अशा शब्दात त्यांनी निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्धार स्वागतानंतर कार्यकर्त्यांना संबोधित करताना व्यक्त केला.



जनसंवादाच्या माध्यमातून मोहोळ विधानसभा मतदारसंघातील माता-भगिनी, ज्येष्ठ व मित्रांच्या सहमतीने कायमस्वरूपी जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कोण कोणत्या ठोस उपाययोजना राबवायच्या लागतील त्याचा अंदाज घेऊनच आपले विचार, आपल्या अपेक्षा समजून पुढे काय करायचं हे ठरविणार असल्याचे माजी आमदार रमेश कदम यांनी सांगितले. रमेश कदम याच्या स्वागतासाठी मोहोळ शहरात हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी दाखल झाले होते. त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

### मराठा आरक्षणासाठी कोंडीत साखळी उपोषण

## आरक्षण मिळेपर्यंत मतदानावर बहिष्कार, राजकीय नेत्यांना गाव बंदी

सुराज्य/सोलापूर

मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी सोलापूर जिह्यातील मराठा समाज आक्रमक झाला आहे. मनोज जरांगे-पाटील आरक्षणासाठी लढा देत आहेत. त्यांना पाठिंबा देण्यासाठी उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी ग्रामस्थांच्या वतीने साखळी उपोषण चालू केले आहे.





यावेळी जो पर्यंत समाजाला आरक्षण मिळत नाही तो पर्यंत मतदानावर बहिष्कार घालण्याचा आणि राजकिय नेत्यांना गाव बंदी करण्याचा निर्णय घेतला आहे. रविवारपासून चालू झालेल्या या साखळी उपोषणास गावातील सर्व जाती धर्माच्या लोकांनी पाठिंबा जाहीर करत उपोषणात सहभागी होत आहेत.

जरांगे-पाटील हे मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून लढा देत आहेत, त्यांना पाठिंबा देण्यासाठी हे साखळी उपोषण केले जात आहे. दररोज सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्रत्येकी दहा जण उपोषणास बसणार आहेत. रविवारपासून हे साखळी उपोषण चालू झाले आहे. उपोषण चालू करण्यापुर्वी मराठा आरक्षण मागण्यांचे फलक घेऊन गावातून फेरी काढण्यात आली. या फेरीमध्ये गावातील विविध जाती धर्माचे आणि शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते. जो पर्यंत आरक्षण मिळत नाही तो पर्यंत हे साखळी उपोषण चालू ठेवले जाणार आहे. आरक्षण नाही मिळाल्यास आगामी निवडणूकावर बहिष्कार घालतला आहे. तो पर्यंत राजकिय नेत्यांना गावबंदी करण्यात आली आहे.

बाळकृष्ण पाटील, भारत पाटील, किसन भोसले, गणेश पाटील शिवाजी निळ, सोमनाथ राऊत, बाबाराजे निळ, तुकाराम पवार, अजिंक्य भोसले, राजु राऊत, ज्ञानेश्वर मोरे, ब्रह्मदेव पवार, दत्तात्रय पाटील, निवृत्ती दळवी, प्रकाश भोसले, अनंत नीळ, प्रसाद नीळ, मनोज निंबाळकर, सोमनाथ निंबाळकर, राहुल निंबाळकर, शहाजी भोसले, संजय भोसले, तुकाराम पाटील, विक्रांत काकडे, आबासाहेब भोसले, बाळकृष्ण पाटील, राजेंद्र राऊत, विलास नीळ, अनिल भोसले, ज्ञानेश्वर मोरे, राहूल निंबाळकर, रमेश शिंदे, नवनाथ जाधव, भारत भोसले, संजय भोसले, गणपत पाटील, गणेश नीळ, , निवृत्ती भोसले, नवनाथ जाधव यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## विवाहितेच्या गळ्याला सुरी लावून दोन लाखांचा ऐवज पळवला

सुराज्य/पंढरपूर

घरात कोणी नसल्याचा फायदा घेत विवाहितेच्या गळ्याला सुरी लावून साडेतीन तोळे, सोने रोख रक्कम असा जवळपास दोन लाखाचा मुद्देमाल दोन चोरट्यांनी लंपास केल्याची धक्कादायक घटना तालुक्यातील गादेगाव येथे घडली.





याप्रकरणी गादेगाव येथील उषा सोमनाथ बागल यांनी गुन्हा दाखल केला आहे. उषा बागल यांचे गादेगावपासून दोन किलोमीटर अंतरावर शेत असून या ठिकाणी त्या कुटुंबासमवेत राहतात. शनिवारी त्यांच्या कुटुंबातील सर्व व्यक्ती बाहेरगावी असल्याने त्या एकट्याच झोपल्या होत्या. यावेळी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास दोन चोर घरात आल्याचे त्यांनी पाहताच आरडाओरोड सुरू केली. मात्र यापैकी एका चोराने त्यांच्या गळ्याला चाकू लावून हिंदीमध्ये आम्ही दोन लोकांचा खून करून आलो असून तू ओरडलीस तर तुलाही फार करू अशी धमकी दिली. यामुळे घाबरलेल्या उषा बागल यांनी आरडाओरड केली नाही तसेच चोरांनी धमकी दिल्यामुळे गळ्यातील मंगळसूत्र व कानातील रिंगा देखील काढून दिल्या. या चोरांनी दोन तोळ्याचे गंठण, अर्धा तोळ्याची सोन्याची अंगठी, चार ग्रॅम सोन्याच्या रिंगा, तीन ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, अडीच ग्रॅम सोन्याची अंगठी, दोन नथी, चांदीचे वाळे, कानातील रिंगा, रोख चाळीस हजार रुपये तसेच मोबाईल असा मुद्देमाल लंपास केला.

## स्पीकरचा आवाज कमी कर म्हटल्याने अंध व्यक्तीस मारहाण

सुराज्य/पंढरपूर

सार्वजनिक गणपती मंडळात लावलेला स्पीकरचा आवाज कमी कर म्हटल्यामुळे अंध व्यक्तिस तिघांनी मारहाण केल्याची घटना तालुक्यातील कौठाळी येथे घडली.

याप्रकरणी अनिल तुकाराम अटकळे या अंध व्यक्तीने सतीश विठ्ठल नागटिळक, विठ्ठल मोहन नागटिळक व सुवर्णा विठ्ठल नागटिळक या तिघां विरोधात फिर्याद दिली आहे. अनिल अटकळे हे दोन्ही डोळ्यांनी अंध असून ते २२ रोजी गावातील सार्वजनिक गणपती मंडळा समोरून जात होते. तेथे मोठ्या आवाजात स्पीकर लावला होता. यावेळी त्यांनी तेथेच असणाऱ्या सतीश नागटिळक यास स्पीकरचा आवाज कमी कर असे सांगितले. मात्र त्याने शिवीगाळ करून अनिल याच्या पाठीवर, अंगावर काठीने मारहाण केली तसेच विठ्ठल नागटिळक याने गजाने तर खाली पडल्यावर सुवर्णा नागटिळक यांनी देखील लाथाबुक्क्याने मारहाण केली. अनिल याचा भाऊ ज्योतिराम अटकळे याने सदर भांडण सोडविले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, हा ख मनातलेही ओळखतो का ?

### आज विसर्ग वाढण्याची शक्यता

## पुण्यातील पावसाचा 'उजनी'ला लाभ

सुराज्य/सोलापूर

उजनी धरण क्षेत्रात आणि पुणे जिल्ह्यात पडत असलेल्या संततधार पावसामुळे उजनी धरणातील पाणीसाठ्यात वाढ होण्याची आशा निर्माण झाली आहे. रविवारी सायंकाळी सहा वाजता दौंड येथून येणारा विसर्ग वाढला असून तो ५ हजार क्युसेक्स इतका झाला आहे. सोमवारी हा विसर्ग १० हजारांपर्यंत जाईल, असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले

पुणे शहर आणि खडकवासला धरण परिसरात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणांमध्ये पाणीसाठा वाढला आहे. पानशेत, वरसगाव तसेच मुळशी धरणातून पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. तर, खडकवासला प्रकल्पात पावसामुळे पाणीसाठा वाढण्यास सुरुवात झाली आहे. आणखी काही दिवस असाच पाऊस सुरू राहिल्यास प्रकल्पातील धरणे १०० टक्के भरतील

ऑगस्ट महिना संपूर्ण कोरडा गेल्यानंतर सप्टेंबर महिन्यात चांगला पाऊस होईल अशी अपेक्षा होती. मात्र,



ती फोल ठरली. अखेर गणरायाच्या आगमनाबरोबर पावसाने पुन्हा आगमन केले. त्यामुळे दोन तीन दिवसांपासून पुणे शहरासह धरण परिसरात पावसाने हजेरी लावली आहे. धरण परिसरात संततधार पाऊस होत असल्याने धरणातील पाण्याची पातळी वाढू लागली आहे.

टेमघर, पानशेत आणि वरसगाव धरणात दोन दिवसांपासून संततधार पाऊस होत आहे. खडकवासला प्रकल्पातील वरसागव, पानशेत ही दोन्ही धरणे शंभर टक्के फुल्ल झाली आहेत. टेमघर धरण आता ७६ टक्क्यांवर आहे. हा पाऊस आणखी राहिल्यास टेमघर धरण भरल्यास १०० टक्के प्रकल्प फुल्ल होण्याची शक्यता आहे. मुठा खोऱ्यातील खडकवासला प्रकल्पात सध्या २७.७४ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा उपलब्ध आहे. म्हणजेच सध्या ९५.१६ टक्क्यांवर पाणीसाठा पोहोचला आहे. नीरा खोऱ्यातील ४३.२८ टीएमसी (८९.५४टक्के) , तसेच एकूण भीमा खोऱ्यात १४० टीएमसी म्हणजेच ७० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. टाटाच्या धरण प्रकल्पातील मुळशी धरणातही पावसाचा जोर पाहता हे धरण भरल्याने त्यातून विसर्ग सोडण्यात आला आहे.

### उजनी पंढरीत दाखल

सोलापूर , पंढरपूर , सांगोला आणि मंगळवेढा या शहरांसह जवळपास १२५ खेड्यांची तहान भागवण्यसाठी उजनी धरणातून पाणी सोडण्यात आले आहे. रविवारी सकाळी अकराच्या दरम्यान हे पाणी गुरसाळे पार करून पंढरीत दाखल झाले आहे.पाण्याचा वेग अत्यंत संथ असून सोलापूरसाठी औजला हे पाणी कधी येईल,हे सांगता येत नाही.

# मध्य प्रदेशची रणनीती

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मध्य प्रदेश राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापत चालले आहे. तिथे सत्ताधारी आणि विरोधात असलेल्या काँग्रेस या दोन पक्षांमध्ये कडवी झुंज असणार आहे.दिल्लीची सत्ता हवी असेल तर उत्तर भारतातील यूपी, मध्य प्रदेश आणि राजस्थान या तीन राज्यांचा कौल अत्यंत महत्त्वाचा असतो. आतापर्यंत या राज्याने काँग्रेस आणि भाजपला कौल दिला आहे. मागील निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाले होते परंतु भाजपने फोडाफोडीचे राजकारण करून ही सत्ता पुन्हा आपल्या ताब्यात घेतली.आता ही निवडणूक दोनही पक्षांच्या प्रतिष्ठेची ठरली आहे.त्यामुळे या दोनही पक्षांच्या नेत्यांना सत्ता मिळवण्यासाठी भलताच घाम गाळावे लागणार आहे. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही पक्षांनी मध्य प्रदेशमध्ये वेगवेगळ्या यात्रांचे आयोजन केले आहे.त्यासाठी दोघांनीही वेगवेगळी रणनीती आखली आहे. मध्य प्रदेशमध्ये आगामी काही महिन्यांत विधानसभा निवडणुकीची घोषणा होणार आहे. सध्या येथे भाजपाची सत्ता असून शिवराजसिंह चौहान हे मुख्यमंत्री आहेत. सध्या या दोन्ही पक्षांनी आपापल्या यात्रा काढल्या आहेत. या यात्रांच्या माध्यमातून दोन्ही पक्ष जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपाने आपल्या यात्रेला 'जन आशीर्वाद यात्रा' तर काँग्रेसच्या यात्रेचे नाव 'जन आक्रोश यात्रा' असे आहे. भाजपाच्या यात्रेची सुरुवात या महिन्याच्या सुरुवातीला झाली असून ती शेवटच्या टप्प्यात आहे. काँग्रेसची यात्रा अद्याप सुरूच आहे. भाजपने राज्याच्या नेतृत्वावर अवलंबून न राहता केंद्रातील नेत्यांना या यात्रेत सहभागी होण्याची विनंती केली आहे. या यात्रेच्या रणनीतीमागे केंद्रीय मंत्री तथा भाजपाचे नेते अमित शाह असल्याचे म्हटले जात आहे. त्यांनीच या यात्रेला २ सप्टेंबर रोजी हिरवा झेंडा दाखवला. ही यात्रा साधारण मध्य प्रदेशमधील २३० मतदारसंघांतून जाणार असून एकूण १० हजार किलोमीटरचा प्रवास करणार आहे. आज या यात्रेचा भोपाळमध्ये समारोप होणार आहे. यात्रेच्या समारोप कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. काँग्रेसने आपल्या यात्रेची सुरुवात १८ सप्टेंबर रोजी सुरू केली. काँग्रेसच्या जन आक्रोश यात्रेत मात्र केंद्रीय नेते दिसत नाहीयेत. स्थानिक नेत्यांच्या उपस्थितीतच ही यात्रा पुढे जात आहे. काँग्रेसची ही यात्रा १५ दिवसांत एकूण ११ हजार ४०० किमी अंतर पार करणार आहे. भाजप आपल्या यात्रेच्या माध्यमातून सध्या मध्य प्रदेशमध्ये असलेल्या सत्ताविरोधी भावनेला थोपवण्याचा प्रयत्न करत आहे. यात्रेदरम्यान शिवराजसिंह चौहान यांच्या 'लाडली बहना' योजनेबद्दल जनतेला सांगितले जात आहे. या योजनेअंतर्गत महिलांना १,२५० रुपये प्रतिमहिना दिले जात आहे. या यात्रेच्या माध्यमातून चौहान प्रखर हिंदुत्ववादी नेता असल्याची प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांना मध्य प्रदेशमध्ये सध्या बुलडोझर मामा म्हटले जाते. या यात्रेदरम्यान शिवराजसिंह चौहान यांच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी बुलडोझरच्या कमानी उभारलेल्या पाहायला मिळत आहेत. आतापर्यंत या यात्रेत एक कोटी लोकांनी सहभाग नोंदवल्याचा दावा भाजपाकडून केला जात आहे. या यात्रेच्या माध्यमातून भाजपा काँग्रेस आणि विरोधकांच्या इंडिया आघाडीवर टीका करत आहे. डीएमकेचे नेते उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन धर्मावर केलेल्या विधानाचा आधार घेत काँग्रेस आणि इंडिया आघाडी हिंदूविरोधी आहे, असा प्रचार भाजपकडून केला जात आहे. भाजपाच्या अंतर्गत सूत्रांनुसार या यात्रेचे सारथ्य फक्त केंद्रातील नेत्यांनीच करावे, अशी योजना आखण्यात आली आहे. शिवराजसिंह चौहान हे पाचव्यांदा मुख्यमंत्री झालेले आहेत. त्यामुळे सत्ताविरोधी लाट निर्माण होऊन लोकांत भाजपाविरोधी मत तयार होऊ नये, यासाठी ही खबरदारी घेतली जात आहे. दुसरीकडे काँग्रेस पक्षाच्या यात्रेत फक्त स्थानिक नेते दिसत आहेत. लोकांमध्ये शिवराजसिंह चौहान सरकारबद्दल असलेल्या असंतोषाचा फायदा घेण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाकडून केला जात आहे. काँग्रेस पक्षाने कर्नाटकप्रमाणेच महिलांना प्रतिमहिना १५०० रुपये, मोफत गॅस सिलिंडर, १०० युनिटपर्यंत मोफत वीज अशी आश्वासने काँग्रेसकडून दिली जात आहेत. मध्य प्रदेशमध्ये दलित, आदिवासी समाजावर झालेला कथित अत्याचार, शेतकऱ्यांचे हाल, बेरोजगारी यांचाही उल्लेख काँग्रेसकडून यात्रेदरम्यान केला जात आहे.एमपींचा कौल काय असेल यावरच भाजपचे केंद्रीय सत्तेतील स्थान अवलंबून असेल.

सामाजिक

# नागपूर जलमय झाले; बोध काय?

**नागपूर जलमय झाल्याच्या चर्चा रंगल्या. शहर जलमय झाल्याचा दोष पावसाचा आहे. कारण तो चार तासांत अभूतपूर्व असा कोसळला. बाकी नागपूर मनपाचे पावसाशी दोन हात करण्याचे नियोजन तर चोख होते. असे प्रमाणपत्र देणेच शेष आहे. कसलीच लाज लज्जा शिल्लक नसलेले नेते केवळ गलिच्छ राजकारण करण्यात कायम मग्न आहेत. निसर्गाने त्यांना आरसा दाखवला की आम्ही लोकांना कसे साहाय्य केले, वेळेत पोचलो याचे पाठ ऐकवले जातात. ऐन सणासुदीला लोकांना पाण्यात राहावे लागणे याला नागपूरशी निगडित लोकप्रतिनिधी उत्तरदायी आहेत. हातात सत्ता आली की, कुठल्याही पक्षाचा लोकप्रतिनिधी आकाशालाच हात टेकल्याच्या गुर्मीत असतात. निसर्गाने तुम्ही अजून किती पाण्यात आहात? हेच यांना दाखवून दिले आहे. आमचा सत्ता काळ-तुमचा सत्ता काळ ही तुलनाच निरर्थक आहे. कारण सर्व काही पाण्यात जाणे हेच दर्शवते की कोणीही सक्षम नाही. मात्र, तसे असल्याचा खोटा आव आणून वेळ मारून घेतली जाते.**

नागपुरात एवढा पाऊस कधी होत नाही. त्यामुळे मुंबईप्रमाणे तुंबई होण्याचा अनुभव नाही. परिणामी नागपूर शहराचे तसे नियोजन नाही. असे बोलणारेही महाभाग असू शकतात. असे बोलताना बंगळुरू, दिल्ली, मुंबई इत्यादी महानगरांची उदाहरणेही देतील. ही वायफळ बडबड करताना शहरे कोणामुळे बकाल झाली आहेत? त्यांच्याकडे कानाडोळा होतो. कोणीही बाजू घेण्याच्या पात्रतेचा नाही. हेच सत्य.





पाऊस काय काही तास अथवा दिवस कोसळेल आणि थांबेल. तशा तुंबलेल्या पाण्यावरून रंगलेल्या चर्चांनाही ओहोटी येईल. याची पक्की खात्री असल्याने जो काही आपल्या नावे आरडाओरडा चालू आहे तो तात्पुरता ऐकायचा, अशी विकृत मानसिकता लक्षात येते.

आम्ही उपराजधानीकडे विशेष लक्ष देत आहोत म्हणून जलमय स्थिती नियंत्रणात येऊ शकली. असा होणारा विचार लोकहिताची कामे करण्याच्या दृष्टीने अत्यंत घातक म्हणावा लागेल. नैसर्गिक आपत्ती येवो अथवा आणखी काही दुर्घटना घडल्यावर लोकप्रतिनिधी केवळ मिरवण्यासाठी तिथे हजर असतात. फोडाफोडीचे राजकारण करून लोकांच्या तोंडाला पाने पुसण्यातच त्यांचा उर्वरित वेळ खर्ची होतो. त्यात नैसर्गिक आपत्ती आली म्हणजे त्यांच्या नियोजनात मिठाचा खडाच पडला नव्हे का? आम्ही जे करतो ते सर्व लोक कल्याणासाठी. मग शहरे बकाल का? ती तुंबतात का? याची उत्तरे देण्यासाठी कोणी आहे का?

पावसाने महाराष्ट्राची आणि नागपूरची जागतिक स्तरावर लाज राखली असे म्हणावे लागेल. याचे कारण असे की, जी - २० परिषदेच्या सिव्हिल - २० या उपसमितीची दोन दिवसीय बैठक नागपूरमध्ये मार्चमध्ये झाली. विशेष म्हणजे याप्रसंगी सकाळच्या सत्रात विकास आणि पर्यावरणीय समतोल हा विषय होता. पर्यावरण जे तेव्हा होते ते आजही आहे आणि उद्याही तेच असेल. मात्र, त्याचा विकासाच्या अनुषंगाने समतोल साधने जमलेले दिसत नाही. पावसाने दाणादाण उडवून देत जे वरकरणी शहर चकाचक करण्याचे पांघरून घातले होते, ते उघडकीस आणले. तेही अवघ्या सहा महिन्यात. चुकून असा पाऊस त्या बैठकी वेळी झाला असता तर नाचक्कीला कसा आवर घातला असता? यावर असे काही झाले तर नाही ना? हे उत्तर होऊ शकत नाही. परदेशातील चकाचक शहरांचे कितीही दौरे करा, त्या सहलींचा काहीही उपयोग नाही. स्वदेशाचा, शहराचा काडीचा अभ्यास नाही किंवा असली तरी जुजबी काहीतरी थातूरमातूर माहिती. आणि चालले सरकारी खर्चाने परदेश दौऱ्यावर. आधी राहत्या शहरावर प्रेम करायला शिका.

पाऊस पडला नाही तर कोरडा दुष्काळ आणि पुष्कळ पडला तर ओला दुष्काळ. एवढंच लोकप्रतिनिधींना कळते. या पलीकडे विचार करत सर्वपक्षीयांनी एकत्र येऊन शहरासाठी धोरण निश्चित करण्याचा विचार यांना जवळचा वाटत नाही. लोक पावसाच्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी जिथे आसरा मिळेल तिथे पोचतात. संसार पाण्यात वाहून जाणे, पाण्याची भीती म्हणजे काय? उपाशी राहावे लागणे, कागदपत्रे खराब होणे इत्यादी म्हणजे काय याची कल्पना लोकप्रतिनिधींना नाही. कारण संकटांचा सामना कायम सामान्य जनताच करते. आपण लोकप्रतिनिधींमुळे संकटात आहोत याची पूर्ण जाण असूनही नेते-कार्यकर्ते यांच्या दादागिरीमय (भ्याड) भीतीमुळे गप्प बसावे लागते. लोकांना व्यक्त होण्याची संधी द्या. बघा तुमचे मग कसे वाभाडे निघतात?

**- जयेश राणे, मुंबई.**

टुडेज् ब्लॉग

# आजचा फार्मासिस्ट

**आज जागतिक फार्मासिस्ट दिन.**

भारतीय संस्कृतीमध्ये कृतज्ञता व्यक्त करण्यास अनन्य साधारण महत्त्व आहे. तेव्हा जागतिक दिन साजरा करणं म्हणजे प्रत्येक जण सामान्यांपासून ते असामान्यांपर्यंत फार्मासिस्टबद्दल माहिती पुरवणं हा हेतू. फार्मासिस्ट हे आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक गटाचे प्रतिनिधीत्व करतात. आपल्या भारत देशात जवळपास फार्मासिस्टची संख्या अफाट वाढत आहे. फार्मासिस्ट महाविद्यालयातून दरवर्षी अनेक विद्यार्थी (फार्मासिस्ट) पास होऊन बाहेर पडतात. त्यांचे कार्य एकमेवाद्वितीय आहे. ज्ञानाच्या, कौशल्याच्या माध्यमातून राष्ट्राचे आरोग्य अबाधित आरोग्यसंपन्न ठेवण्यासाठी योगदान देत आहे. त्यांच्या कार्यात पारदर्शकता आहे. निरोगी जीवनदान देण्याचा प्रयत्न करीत आहेत. जनतेला त्याची जाणीव करुन देण्यासाठी जागतिक फार्मासिस्ट डे म्हणून साजरा करणं काळाची गरज आहे.

औषधे निर्मिती, संशोधन करणाऱ्याचा जनतेशी प्रत्यक्ष संबंध येत नसला तरी ही डिस्पेन्सिंग करणाऱ्या फार्मासिस्टचा रुग्णाच्या नातेवाईकांशी निकटचा संबंध येतो. शासकीय, निमशासकीय, खाजगी असो वा सेंट्रल गव्हर्नमेंट असो किंवा औषधे विक्रेते दुकानदार असो, फार्मासिस्टकडून जनतेला आरोग्य सेवा दिली जाते. त्या सेवेत आहे स्वार्थही आणि परमार्थही. वेतन घेतो तो स्वार्थ आणि सेवा देतो तो परमार्थ. आजचा फार्मासिस्ट हा सर्वांच्याच परिचित आहे. याहीपेक्षा जेव्हा फार्मासिस्ट हॉस्पिटलमध्ये कार्यरत असतो तेव्हा डॉक्टरपेक्षा जास्त संपर्क रुग्णांशी फार्मासिस्टचा येतो. तो म्हणजे असा की, रुग्ण हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यापासून तो डिस्चार्ज होऊन घरी जाईपर्यंत हेही इथे आवर्जून नमूद करावयास वाटतं. आजच्या घडीला अशी परिस्थिती आहे की, शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी हॉस्पिटलमध्ये फार्मासिस्टना डिस्पेन्सिंग व्यतिरिक्त किंवा नियमित कामाव्यतिरिक्त इतरही कामे त्यांच्यावर लादली जातात. ती त्यांना नाईलाजाने करावी लागतात. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद अंडर असलेल्या दवाखान्यातून तर परिस्थिती अशी असते की, जर हा अपरिहार्य कारणास्तव डॉक्टर गैरहजर असतील तर त्यांच्या समाधानासाठी किंवा रुग्णांना दिलासा देण्यासाठी का होईना फार्मासिस्टला स्वत:चं काम सांभाळून डॉक्टरांचं काम बघावं लागतं. अनेक वेळा रुग्णांच्या रोषाला आणि नातेवाईकांच्या उसळलेल्या रागाला सामोरे जावं लागतं. काही काही ठिकाणी फार्मासिस्ट बळीही गेलेले आहेत. हे बंद व्हायला हवं. आणखीन एक मुद्दा इथे नमूद करावासा वाटतो. शासकीय स्तरावर अनुपस्थित अप्रशिक्षित व्यक्तींकडून औषधे वितरण केली जातात. परिणामी रुग्णांच्या आरोग्यास अपायकारक झाल्याच्याही घटना घडून गेलेल्या आहेत. मग तिथे असतील बालवाडी, अंगणवाडी किंवा इतर शासकीय ठिकाणे अप्रशिक्षित व्यक्तींकडून चुकीची औषधे देऊन विषबाधा झालेल्याच्या घटनाही आढळून आलेल्या आहेत. उदा. लहान मुलांना, बालकांना जंताचे औषध देण्याऐवजी जंताची गोळी दिल्याने घशात अडकून मृत्यूही झाल्याच्या घटना झालेल्या आहेत.

शासनाने फार्मासिस्टची नेमणूक करुन असे जीवघेणी प्रकार थांबवणं नितांत गरजेचे आहे. आजच्या घडीला महाराष्ट्र स्टेट फार्मासिस्ट कौन्सिलकडे भरपूर प्रमाणात फार्मासिस्टची नोंद आहे. महाविद्यालयातून दरवर्षी पासिंग होऊन मुले बाहेर पडतात आणि त्यात वाढ होत आहे. याचा ही विचार शासनाने केला पाहिजे. आरोग्य सेवेचा महत्त्वपूर्ण घटक फार्मासिस्ट आहे. तो रुग्णांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने पुरेपूर प्रयत्न करत असतो. कारण त्याच्याकडे औषधी ज्ञानाचे भांडार परिपूर्ण आहे. फार्मासिस्ट परिणाम, दुष्परिणाम, अपाय, उपायांचे ज्ञान असलेले आणि नियमांचे भान असलेल्या फार्मासिस्टला कसे औषधाचे डोस द्यायचे याचीही माहिती असते. औषधे कशी साठवण करायची किंवा ती कशी आणि केव्हा निकालात काढायची याचाही अभ्यास झालेला असतो. म्हणूनच जनआरोग्य कसं अबाधित राहील यासाठी तो सतर्क असतो. खाजगी हॉस्पिटल असो किंवा शासकीय हॉस्पिटल असो किंवा औषध विक्रेते दुकानदार असो त्याचं वितरण हे फार्मासिस्टकडूनच व्हायला हवं. खाजगी व्यवसायात फार्मासिस्टच्या गैरहजेरीत प्रिस्क्रिप्शन व बिलाशिवाय होणाऱ्या औषध विक्रीवर प्रशासनाने बऱ्याच वेळा पायबंद घालता असताना औषधे विक्रेतेच्या काही काही संघटनांनी अवाजवी मागण्यासाठी बंद पुकारला आणि रुग्णांना वेठीस धरण्याचा प्रयत्न केला. बंदमध्ये सहभागी होण्यासाठी फार्मासिस्टला दबाव आणला. त्या दबावाला बळी न पडता आपले फार्मासिस्टचे कार्य फार्मासिस्टने औषधे देण्याची सेवा चालू ठेवून त्याच्या कार्यात पारदर्शकता दाखविली. अर्थात रुग्णांसाठी त्यांनी आपले कार्य चालू ठेवून आपले कर्तव्य पार पाडण्याचा प्रयत्न सातत्याने करतात. त्यामुळे समाजात फार्मासिस्टचा दृष्टीकोन सकारात्मक राहिला आणि त्यांचे अस्तित्व जनतेला समजले. फार्मासिस्टनी आपले वैशिष्ट्य ओळखून समाजाला चांगल्या प्रकारची सेवा कायमस्वरुपी द्यावी, हीच जनतेकडून त्याच्याबद्दल अपेक्षा आहे.




फार्मासिस्टनी आपल्या ज्ञानाचा पुरेपूर फायदा रुग्णांना द्यावा किंवा नातेवाईक यांना फार्मासिस्ट, नॉन-फार्मासिस्ट यातला फरक कळायला हवा. त्यांनी फार्मासिस्टकडूनच औषधे घेण्याचा आग्रह धरला पाहिजे. चुकीची औषधे आपल्याला मिळणार नाही याचीही नातेवाईकांनी खात्री करुन सजग राहिलं पाहिजे. सरकारकडून फार्मासिस्टची म्हणावी तशी भरती केली जात नाही ही एक शोकांतिका आहे. उदाहरणच द्यायचं झाले तर आठवा तो कोरोनाचा भयाण काळ. कोरोना महामारीत आपला जीव धोक्यात घालून जीवाची पर्वा न करता अहोरात्र रुग्णांची वैद्यकीय सेवा केली, रुग्णांसाठी योगदान दिलं. ज्या ज्या आरोग्य सेवकांना शासनाने कॉन्ट्रॅक्ट बेसवर घेतलं, त्यांना कायमस्वरुपी सेवेत घेऊन त्यांची ऊर्जा वाढविली पाहिजे. एक महत्त्वाचं सांगायचं म्हणजे व्हॅक्सिन लस तयार करुन साऱ्या जगाला कोरोनासारख्या विषारी जीवाणूंपासून वाचवलं, हे केवढे उपकार आहेत त्या फार्मासिस्टचे. धन्य तो फार्मासिस्ट आणि धन्य त्यांनी दिलेली सेवा. हीच फार्मासिस्ट दिनी एका लेखिकेची विनंती. आजच्या फार्मासिस्ट दिनानिमित्त सर्वच फार्मासिस्टना हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

**- पुष्पा गायकवाड, सोलापूर.**

जन्म हा अखेरचा

# शुश्रूषुस्थल - २



सूर्य-ताऱ्यांना प्रकाशित करणारा परमात्मा प्रकाशरुप आहे. परमात्मा आनंदरुप आहे. प्रपंचात दु:ख आहे तर परमात्म्यात आनंद आहे. त्या आनंदसागराची सामान्य माणसाला कल्पनादेखील करता येणार नाही. प्रपंच अनित्य आहे. त्याच्यात क्षणोक्षणी परिवर्तन होत असते. मनुष्याचा देह जसा काल असतो तसा आज नसतो. परंतु परमात्मा मात्र स्थिर आहे, नित्य आहे. शिष्याने श्रेष्ठ तत्त्व कोणते असे विचारल्यावर गुरु शिवतत्त्वाची महती सांगत असतात. शिवतत्त्वातूनच सर्व तत्त्वे उत्पन्न झाली आणि शेवटी ती त्यातच विलीन होणार आहेत. म्हणून शिवतत्त्व हे परमतत्त्व होय. ते जाणल्याने परिपूर्ण ज्ञान होते.

**शुश्रूषुस्थल - ३**

शिष्य श्रीगुरुजवळ तीन प्रश्‍ने विचारतो, हे आपण ऐकलं आहे. या तीन प्रश्‍नांची उत्तरे मिळाल्यावर पुढे प्रश्‍नच उत्पन्न होत नाहीत. प्रपंचात आल्यावर कोणते तत्त्व जाणावे? हा पहिला प्रश्‍न आहे. याचे थोडे उत्तर ऐकले आहे. शिव हे सर्वश्रेष्ठ तत्त्व आहे, हे त्याचे उत्तर होय. दुसरा प्रश्‍न आहे, या सर्व प्रपंचाचा आधार कोणता? तो कशावर स्थिर आहे?

प्रपंचात राहून देखील आपल्याला हा प्रश्‍न पडत नाही, या प्रश्‍नाचा विचार करायला कोणाला वेळ नसतो. खा, प्या, मौज करा, आपली कामे करा, यातच आपण गुंतून गेलेलो असतो. उ गाच ड ोकेफोड कशाला करायची? परंतु कधी ना कधी तरी हा प्रश्‍न तुम्हाला पडेल. प्रत्येक वस्तूला आधार असतो. पुस्तक टेबलावर असते, म्हणून पुस्तकाचा आधार टेबल असतो. टेबल जमिनीवर असते, म्हणून टेबलाचा आधार जमीन असते. जमिनीचा आधार कोणता? पुढे काही माहीत नसते, पण तिलाही काही आधार असेलच. तसा प्रपंच कशाच्या आधारावर उभा आहे, या प्रश्‍नाचे उत्तर येथे सांगतात,

**अयथार्थप्रपंचोऽयं प्रतितिष्ठति शंकरे ।**

**सदात्मनि यथा शुक्तौ रजतत्त्वं व्यवस्थितम् ॥**

**(श्रीसिद्धांतशिखामणी, १७.७७)** प्रपंचाचे स्वरुप प्रथम सांगून नंतर त्याचा आधार कोणता याचे स्पष्टीकरण केले आहे. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# बदलत्या स्वरूपातही आशेचे किरण


सध्या अबालवृद्धांच्या आवडत्या श्री गणेशाचे घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळांच्या श्री गणेशाचे आगमन ही उत्साहात झाले असून आता दहा दिवस भक्ती, आनंद आणि विविध कार्यक्रमांनी व्यस्त राहणार आहेत.



तथापि, यंदाचा गणेशोत्सव समाजाला, देशाला भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर साजरा होत असला तरी उत्साह, आनंद, भक्ती, जोश तोच असेल. मात्र ज्या उद्देशाने लोकमान्यांनी हा उत्सव सुरु केला तो हरवत चालला की काय अशी शंका आता अलिकडच्या काही वर्षांमध्ये येऊ लागली आहे. धार्मिकता आणि आधुनिकता यांचा सुंदर मिलाफ असलेल्या गणेशोत्सवादरम्यान गतवर्षी पुणे-मुंबईसारख्या महानगरांमध्ये न्यायालयाचा अवमान, पोलिसांवर धावून जाणे, काही प्रसंगी प्रशासनाच्या नियमांचे उल्लंघन आदी प्रकार घडले. अशा वेळी धार्मिक सण-उत्सवांमध्ये काळानुसार आधुनिकता येऊन मूळ स्वरूप बदलत चालले असल्याने साहजिकच कार्यकर्त्यांचा उत्साह वाढलेला असतो. अशा आनंदाच्या प्रसंगी नियमांचे पालन काही वेळा होत नसले तरी गणेशोत्सवातील देखाव्यांत काळानुरूप बदल होऊन सामाजिक समस्या, भारतीय सेनेचा पराक्रम, साथीच्या रोगांवर उपाय, स्त्रीभ्रूणहत्येला विरोध असे अनेक विषय देखाव्यांतून लोकांपर्यंत पोचविले जाऊ लागले.

सामाजिक कार्य नुसतेच देखाव्यात नाही तर अनेक गणेशोत्सव मंडळे हिरीरिने करायला लागली. त्यामुळे हे कार्यकर्ते डॉल्बी, वाहतूक, कचरा, स्वच्छता, न्यायालयाचे निर्णय, पोलीस आणि प्रशासनास सहकार्याची भूमिका आदी प्रश्‍नांवर भावी काळात उपाय सुचवतील, अशी सकारात्मक आशा करण्यास हरकत नाही. महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला सुमारे १२५ हून अधिक वर्षांची परंपरा असून गणेशोत्सव साजरा करण्यात अनेक सामाजिक आणि वैयक्तिक फायदे आहेत. यानिमित्ताने सामाजिक एकोपा, सुरक्षितता, उत्सवांचे पावित्र्य अबाधित ठेवावे. तसेच गणेशोत्सवात महिला कार्यकर्त्या सहभागी झाल्या तर निश्चितपणे उत्सवात होणाऱ्या गैरप्रकारांना आळा बसेल आणि सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूप बदलून जाईल, असे वाटते.

**- प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**



- संतविचार -

डॉ. देविदास गुरव, सोलापूर

# 'अवघा तो शकुन'

**'अवघा तो शकुन ।**
**हृदयी देवाचे चिंतन**
**येथे नसता वियोग ।**
**लाभा उणे काय मग**
**छंद हरिच्या नामाचा ।**
**शुचिर्भूत सदा वाचे**
**तुका म्हणे हरिच्या दासा ।**
**शुभ काळ अवघ्या दिशा'**

संत तुकोबा म्हणतात, 'हृदयी देवाचे चिंतन असणे सर्वात मोठा शुभ शकुन आहे. भगवंत चिंतनात अडथळा (वियोग) येणार नसेल तर लाभाचीही उणीव भासत नाही. वाणीला निरंतर हरिनामाचा छंद जडला आहे. त्यामुळे वाचा शुचिर्भूत झाली आहे. अशा हरिच्या दासाला सर्व दिशा व सर्व काळ सदा शुभच आहेत. हृदयात, वाणीत जर हरिस्मरण असेल तर अवघे विश्व शकुन भासते. पुढे ते म्हणतात, 'नित्य-निरंतर भगवंताची आठवण ठेवावी. शकुन-अपशकुनाचा विचार न करता, मान-अपमान, लोकनिंदा व विषयाची गुंती गुंडाळावी नि विठ्ठलास भजावे. नामस्मरणानेच वाणी शुचिर्भूत होते. कारण हरीचे नामच सर्वात शुभ आहे. सर्व अशुभाला दूर करणारा किंवा नष्ट करणारा भगवंताचे नाम आहे. म्हणून परिपूर्ण शकुन असलेले ईश्वर नाम वाणीतून उच्चारताना मुक्तपणे करा, असाच संदेश संतांनी दिला आहे. देवाचे नाम म्हणजे

**'शांतीची वसती । खुटे काळगती'**

असा अनुभव देणारा आहे. अंत:करणपूर्वक देवाला जवळ केले की मनाला शांतता लाभते. समाधानाचा वैशिष्ट्यपूर्ण अनुभव येतो. ज्याप्रमाणे वृक्ष कुणाचाच अव्हेर करत नाही, त्याप्रमाणे ईश्वरही कुणाला दूर लोटत नाही. खऱ्या भक्ताला तो आणखी जवळ करतो. त्याच्या भक्तीचा परिस स्पर्श अंतरंगाला झाला की सारा 'शीण' (वाईटपणा) दूर होतो. तेव्हा तुकोबाराय निर्धार करून म्हणतात पांडुरंगा ! मी माझा 'धर्म' सोडणार नाही. तुझ्याच नामाचे गायन निरंतर करीन. सदा तुझेच चिंतन करेन.

**होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ।**
**हाचि माझा नेमधर्म । मुखी विठोबाचे नाम**

साऱ्या भौतिक वैभवाचा, सुखाचा, धन संपत्तीचा त्याग करून तुझ्यासाठी भिकारी होईन.



'मुखी तुझे नाम' हाच माझा धर्म आहे. कारण तुझ्या नामापुढे लौकिक सुख-दुःखाचे काहीच मोल नाही. जेव्हा परमात्मा मुखी असतो, तेव्हा सांसारिक भय रहात नाही.

आपले पंचेंद्रिये विठोबाला समर्पित केल्याने वृथा अहंकार, अतिरिक्त लालसा, अभिलाषा आसक्ती, आसुरी, मोह, माया नाहीशा होतात. अविद्या व अज्ञानाचे निरसन होते. संत म्हणतात, 'त्याप्रमाणे चित्त शुद्धीकरिता नामस्मरण हवे. विषयासक्त वृत्ती पालटण्याकरिता नाम साधना हवी.'

**'मना सोडूनी सर्व विषयी खोडी**
**लावी विठ्ठलेशी गोडी'**

नाथांचेही हेच सांगणे आहे. कर्मकांडात न अडकता वेळेचे बंधन न पाळता 'असाल तेथे नामाचे चिंतन' अशा सात्त्विक वृत्तीसह काया-वाचा-मनाने ईश्वरच देहात सामावून घ्यावा, हाच संतवाणीचा मथितार्थ आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# 'पांडुरंग'च्या सभासदांना दिवाळीसाठी १५१ रुपयांचा दर देणार


## प्रशांतराव परिचारक यांची सर्वसाधारण सभेत घोषणा ▶▶ कारखान्याचा २७५१ जिल्ह्यात उच्चांकी दर

सुराज्य/श्रीपूर

**कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वसंतराव परिचारक यांनी सभासदांना दिवाळी सणासाठी १५१ रुपयांचा हप्ता जाहीर केला असून गेले हंगामात गाळप केलेल्या उसाला २७५१ रुपये अंतिम दर कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी जाहीर केला ते श्रीपुर येथील कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते.**

यावेळी व्यासपीठावर व्हाईस चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, दिनकरभ मोरे, वसंतराव देशमुख, दाजी पाटील, उमेशराव परिचारक, पंढरपूर बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड, पंढरपूर अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, माजी उपसभापती वामन माने, माजी उपसभापती प्रशांत देशमुख, बाळासाहेब सालविठ्ठल, सिताराम नागणे, कारखान्याचे संचालक -दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमार, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, हनुमंत कदम, सुदाम मोरे, विजय जाधव, किसन सरवदे, शामराव साळुंखे, राणू पाटील व दिलीप गुरव आदी उपस्थित होते.

सर्वांचे स्वागत व्हाईस चेअरमन कैलासराव खुळे यांनी केले. यानंतर श्रद्धांजली ठरावाचे वाचन दिनकर मोरे यांनी केले. कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी सर्वसाधारण सभेतील विषयांचे वाचन केले.



यावेळी पांडुरंग ऊस भुषण पुरस्कार पुंडलिक पांडुरंग मोरे यांना १ लाख रुपये ट्रॉफी पांडुरंग आदर्श शेतकरी पुरस्कार शकुंतला रोंगे, माणिक हरी भोसले, रामचंद्र नाथा जाधव, राहुल मच्छिंद्र सावंत, हिम्मत हणमंत खुळे, नारायण चौगुले आदींनी पुरस्कार कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते ट्रॉफी पांडुरंगाची मूर्ती, रक्कम बक्षिस देऊन सर्वांचा सन्मान करण्यात आला.

परिचारक म्हणाले की, साखर कारखानदारीत मेजर उत्पन्नाचे स्त्रोत साखर आहे. साखरेची रिकवरी अधिक मिळवणे ही काळाची गरज आहे. कोल्हापूर विभागातील कारखान्यांची १२ ते १३ रिकवरी चांगली असल्याने त्या साखर कारखान्यांना तीन हजारांपासून ३२००, ३३०० दर देणे परवडते, आपली साखर कारखानदारी चालवताना अधिकाची रिकव्हरी ठेवून अधिकचे गाळप करून कारखान्याचा खर्च कमी करणे या तीन तत्त्वावर साखर कारखानदारी चालत आहे. या तत्त्वात आपण यशस्वी झालो तर निश्चितच सभासदांना चांगला दर देऊ शकतो. ज्या ज्या सभासद शेतकऱ्यांनी कारखान्याच्या स्पधत भाग घेऊन कष्ट घेऊन पुरस्कार मिळवले त्या सर्व शेतकऱ्यांचे मी अभिनंदन करतो आणि पुढील या स्पर्धेत जास्तीत जास्त सभासद शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करून सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या सभासद शेतकऱ्यांसाठी दिवाळी सणासाठी १५१ रुपयांचा हप्ता जाहीर केला.

पांडुरंग कारखान्याच्या सर्वसाधारण सभेला सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार दिलीपराव चव्हाण यांनी मानले.

### जनता बँक व्याख्यानमालेचे उद्घाटन

## शिवछत्रपतींचा सामर्थ्यसंपन्न मार्ग भारतासाठी सर्वोत्तमः मोहन शेटे

**सोलापूर :** देश महासत्तेकडे वाटचाल करीत असताना सामर्थ्यसंपन्न भारतासाठी श्री शिवछत्रपतींचाच मार्ग सर्वोत्तम आहे, असे प्रतिपादन शिवचरित्र अभ्यासक मोहन शेटे (पुणे) यांनी केले. जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या ४७ व्या वर्षाच्या व्याख्यानमालेचे उद्घाटन रविवारी शिवस्मारक सभागृहात झाले.

सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांच्या व्याख्यानमालेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, संचालक पुरुषोत्तम उडता, आनंद कुलकर्णी, राजेश पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी, गणेशोत्सव समितीच्या अध्यक्षा शैलजा देशपांडे उपस्थित होते. शेटे म्हणाले, श्री शिवराज्याभिषेकाचा दिवस संपूर्ण भारत वर्षासाठी स्वातंत्र्याचा सोहळा होता. मात्र महाराजांच्यानंतर त्यांनी दिलेली शिकवण काही दशकांनंतर भारतीय विसरले. परिणामी, इंग्रजांचे राज्य भारतावर आले. त्याची किंमत आपल्याला १५० वर्षे चुकवावी लागली. भारताचा पाकिस्तान होऊ नये असे वाटत असेल तर महाराजांची शिकवण आचरणात आणावी लागेल. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बँकेच्या उपसरव्यवस्थापिका अंजली कुलकर्णी, व्याख्यानमाला समितीचे प्रमुख मदन मोरे आदी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. जागृती देशपांडे यांनी सूत्रसंचालन तर विनायक कुरापाटी यांनी आभार प्रदर्शन केले.



## युवकांनी शास्त्रीय दृष्टिकोन विकसित करावा : देवधर

सुराज्य/सोलापूर

अवकाश आणि संरक्षण क्षेत्रामध्ये आपली प्रगती पाहून इतर देश आता आपल्याकडे आदराने पहात आहेत. ही आपल्या भारताची एक मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. भारतीय शास्त्रज्ञांना जर असेच प्रोत्साहन मिळत राहिले तर आपले शास्त्रज्ञ आणखी प्रगती करू शकतात. जगाच्या दृष्टिकोनातून भारत नक्कीच लवकर विश्व गुरु बनेल हा आत्मविश्वास डीआरडीओचे निवृत्त वरिष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर यांनी मार्गदर्शनपर व्याख्यानात व्यक्त केला.

विश्व संवाद केंद्र, पुणे व सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ ( शिवस्मारक ) येथे माध्यम संवाद परिषद परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून शिल्पा निंबाळकर (विश्वसंवाद केंद्र, पुणे), श्री. सागर सुरवसे (सरचिटणीस-श्रमिक पत्रकार संघ सोलापूर) यांची प्रमुख उपस्थिती होती .



देवधर म्हणाले, प्रत्येक युवकांनी अवकाश आणि संरक्षण क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोन विकसित करावा. देश सेवेसाठी आपल्या आवडीच्या क्षेत्रात उत्तम कार्य करून ही देशसेवा घडू शकते. भारतीय युवकांमध्ये देशाविषयी आणि राष्ट्राविषयी प्रेम निर्माण करण्यासाठी प्रत्येक कामामध्ये आपली गोडी निर्माण करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी प्रतिपादन केले.

लोकशाही मध्ये माध्यमांना 'चौथा स्तंभ' असे संबोधलेले आहे. वर्तमानपत्रापासून (प्रिंट मिडीया ) सुरू झालेला हा 'माध्यमांचा प्रवास' इलेक्ट्रॉनिक मिडीया, सोशल मिडीया, डिजीटल मिडीया इथंपर्यंत येऊन पोहोचलेला आहे. माहितीच्या आदान-प्रदानापासून मनोरंजन व प्रबोधनापर्यंतची सर्व जबाबदारी माध्यमे सक्षमपणे उचलत आहेत. अशा सर्व 'माध्यमकर्मीकांचा परस्पर परिचय व्हावा, अनुभवांची देवाण घेवाण व्हावी व सर्वांमध्ये यथोचित संवाद सुरु होऊन देशहिताच्या दृष्टीने समाजामध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होण्यासाठी एक प्रयत्न म्हणून 'माध्यम संवाद परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सदर परिषदेस साहित्य क्षेत्र, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीया, सोशल व डिजीटल मिडीया मधील 'माध्यमकर्मी , तसेच पत्रकारितेचे विद्यार्थी, प्राध्यापक,अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकते, व्याख्याते, लेखक उपस्थित होते. व्याख्यान सत्रा नंतर संवादाचे सूत्रसंचालन राहुल पावले यांनी केले चर्चा देखील आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ . शिल्पा निंबाळकर व सागर सुरवसे यांनी केले तर प्रमुख अतिथी चा परिचय . सूत्रसंचालन रसिका शिंदे यांनी केले तर आभार प्रा नवराज काळदाते यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रसिका शिंदे, राहुल पावले, सूरज पाटील, प्रशांत देशपांडे, प्रा नवराज काळदाते यांनी परिश्रम केले



## गुरुजीचा संकल्प! बालिका दिनी ठेवले कन्येचे नाव

**सोलापूर :** सोलापूर- काही व्यक्ती विशिष्ट ध्येयाने प्रेरीत होवून काम करतात..रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दाभीळ येथे उपशिक्षक पदावर काम करणारे शाहीर नवनाथ आवारे यांना ५ जून रोजी कन्यारत्न झाले.त्यांचा आनंद गगनात मावेना.आपल्या मुलीचे नाव २४ सप्टेंबर रोजी बालिका दिनी ठेवायचे असे नियोजन केले अन् आज भागाईवाडी येथे घोडके पाटील परिवारात हा सोहळा संपन्न झाला. यावेळी आज्जा नवनाथ आवारे,आज्जी जयश्री,तर भागाईवाडी येथील कविता घोडके पाटील,शोभा ब्रह्मदेव घोडके,अनिता करंडे,सह भागाईवाडी,सासुरे,मसले खुर्द,दारफळ सिना,जामगाव सह पाहुणे महिला उपस्थित होते.

## लग्नाच आमिष दाखवून बलात्कार; दोघांवर गुन्हा

**सोलापूर :** विवाहित असल्याचे लपवून सोलापूरातील एका तरुणीची विवाह केला. आणि मारहाण करीत तिचा गर्भपात करून सोडचिठ्ठीची मागणी केल्याप्रकरणी कळवा (जि.ठाणे) येथील विवाहित तरुण आणि तिची दुसरी आई याच्या विरुद्ध सदर बझारच्या पोलिसांनी बलात्कार आणि हुंड्याचा गुन्हा नुकताच दाखल केला आहे. ती तरुणी सोलापुरात राहण्यास आहे. कळवा (जि.ठाणे) येथील तो तरुण तिच्या घरी प्रार्थनेद्वारे बहीणीचा उपचार करतो म्हणून तिच्या घरी २०२० साली आला होता.आपण विवाहित असल्याचे खोटे सांगून त्याने तिच्याशी विवाह केला.ती गर्भवती असताना हे मूल माझे नाही. असे म्हणत तिला तो नेहमी मारहाण करायचा. त्यात तिचा गर्भपात झाला. गर्भपात झाल्याची वाच्यता केल्यास तुला ठार मारतो. अशी धमकी त्याने आणि त्याच्या आईने दिली होती. त्यानंतर तो मुंबईत राहून तिला सोडचिठ्ठी दे अशी मागणी केली. असे पिडीतेच्या फिर्यादीत नमूद आहे.

## शिक्षण विभागासारखीच जलजीवन मिशन विभागाची अवस्था

### खमक्या कार्यकारी अभियंता मिळत नसल्याने कामे ठप्प

सुराज्य/सोलापूर

हर घर जल ही केंद्र - राज्य शासनाची अति महत्त्वाची पाणीपुरवठ्याची योजना आहे. या योजनेत महाराष्ट्र शासनाकडून जल जीवन मिशन म्हणून पाणीपुरवठ्याची राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत .मात्र ही योजना प्रभावीपणे चालवण्यासाठी जिल्हा परिषदेला अद्याप खमक्या कार्यकारी अभियंता मिळत नसल्याने या जलजीवन मिशन विभागाची अवस्था जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागा सारखेच झाल्याचे दिसत असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे .



नव्याने सुरू झालेल्या या योजनेत तीन महिन्यांमध्ये तीन ते चार अधिकारी होऊन गेले. मात्र जल जीवन मिशनची जेवढ्या गतीने कामे व्हायला पाहिजे होती, त्या गतीने झाली नसल्याने आणि कामांमध्ये विस्कळीतपणा आल्याने येथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना तडकाफडकी पदावरून हटवण्यात आले. त्यामुळे महत्त्वाच्या कामास मोठा खो बसल्याचे चित्र आहे. त्यामुळे सध्या प्रशासन या कामात मिशन मोडवर असून डिसेंबर अखेरची डेट लाईन देण्यात आली आहे. सध्या ८५५ कामासाठी १५३ कोटींचा निधी प्रति व्यक्ती दररोज ५५ लीटर पाणी नळाद्वारे देण्याचा संकल्प सोलापूर हर घर जेल या उपक्रमांतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या वाट्यातून सोलापूर जिल्हा ग्रामीण भागात ८५५ जेल जीवन मिशन अंतर्गत कामे मंजूर आहेत. यासाठी १५३ कोटीचा निधी मंजूर आहे ८३ कोटीचा निधी प्राप्त झाला आहे ही कामे डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याची डेट लाईन आहे. त्या दृष्टिकोनातून जिल्हा परिषद प्रशासन कामाला लागले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना प्रतिमा दररोज ५५ लिटर पिण्याचे शुद्ध पाणी नळाद्वारे मिळावे यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे केली जात आहेत. एकूण मंजूर ८५५ कामांच्या ई सर्व निविदा प्रक्रिया पार पडल्या आहेत ८५५ कामापैकी ७७१ कामे बंद होती ती पुन्हा पूर्ववत सुरू करण्यात आली आहेत. ही कामे दर्जेदार व वेळेत व्हावीत अशा प्रकारचे प्रशासनाची अपेक्षा आहे.

### शाळा -अंगणवाड्यांनाही जोडणार

जलजीवन मिशन उपक्रमा अंतर्गत ग्रामीण भागात प्रत्येक कुटुंबाबरोबर वाड्यावर वस्त्या वगळता गावागावात असणाऱ्या शाळा अंगणवाड्यांच्या इमारतींना हे नळ कनेक्शन देण्यात येणार आहेत. सुरू असणाऱ्या कामांची तालुका निहाय माहिती अक्कलकोट १०० बार्शी ८८ करमाळा १०४ माढा १११ माळशिरस ९० मंगळवेढा ६१ मोहोळ ६० पंढरपूर ६२ सांगोला ६९ उत्तर सोलापूर ३३ दक्षिण सोलापूर ७७ एकूण कामे ८५५ असल्याचे सांगण्यात आले

## नातेपुते येथे पर्युषण पर्व उत्साहात

**नातेपुते :** नातेपुते येथे जैन समाजातील बांधव, माता भगिनी पर्युषण पर्व उत्साहात साजरा करण्यात आला. रविवारी या पर्वाचा सहावा दिवस होता. जैन समाजातील सगळे बांधव एकत्रित येऊन हा सण उत्साहाने साजरा करतो, अशी माहिती नातेपुते नगरपंचायतीचे नगरसेवक तथा अहिंसा सेवा समितीचे अध्यक्ष अविनाश दोशी यांनी दिली. पर्युषण पर्वमध्ये रोहित गांधी, सुमित गांधी, पियूष दोशी, निशांत गांधी, शौर्य गांधी, सुजल चंकेश्वरा, वृषभ चंकेश्वरा, अभिषेक दोशी, वर्धमान शहा, डॉ. तेजस चंकेश्वरा, सजन दोशी, पूजा गांधी, स्वस्ति दोशी, श्रेया गांधी, मिताली गांधी, किमया गांधी, सई दोशी, त्रिषिक शहा, सिध्दी दोशी, खुशबु चंकेश्वरा या कुमार कुमारींनी पाच उपवास केले आहेत. प्रतिक गांधी, खुशी दोशी, सायरी डुडू, सुमन गांधी यांनी दशलक्षणाचे दहा उपवास केले आहेत. सौजन्य गांधी, प्रताप चंकेश्वरा, साधना दोशी यांनी पर्युषण पर्व व्रताचे सोळा उपवास करत आहेत.

## बसवनगर येथे उद्या कृषी प्रवचन

**सोलापूर** :सोलापूर-विजयपूर रस्त्यावरील बसवनगर (तेरा मैल) येथील श्रीसदगुरू गणपतराव महाराज आश्रमात २६ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत कृषी प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये कोल्हापूरचे राहुल टोपले यांचे नैसर्गिक व पारंपरिक शेती या विषयावर मराठीतून तर विजयपूरचे बसवराज बिरादार हे शेतीतज्ञ कन्नडमधून मार्गदर्शन करणार आहेत. शेतकरी बांधवांनी याचा लाभ घ्यावा,असे आवाहन बलभिम वारे, संगप्पा बगले, युवराज साठे (मंद्रुप), कल्लप्पा भतगुणकी(हत्तरसंग) व मल्लिकार्जून जामगोंडे (निंबर्गी) केले आहे.

## अय्या गणपतीस बंदपट्टे यांनी केला चांदीचा किरीट अर्पण

सुराज्य/सोलापूर

वडार समाजाच्या मानाचा श्रीमंत अय्या गणपतीच सीए. सुशिल बंदपट्टे परिवाराच्या वतीने माणिक चौकात गणेशमुर्तीचे पूजन करून सात किलो वजनाचा चांदीचा किरीट गणेश मुर्तीस चढवत अर्पण केला.

समाजाचाच्या कामात बंटपट्टे परिवार नेहमी अग्रेसर असतात. समाजाच्या श्रीच्या गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना झाल्यानंतर बंदपट्टे परिवारांनी श्री गणेश चतुर्थीचे औचित्य साधत श्रीमंत मानाचा अय्या गणपतीस 'सात किलो चांदीचा किरीट अर्पण करून सेवा दिली राज्यातील विविध जिल्हयात हे किरीट घडवण्याचे हे काम सोपवण्यात आले होते. ४० दिवस मेहनत घेऊन कारागिरांनी हा किरीट बनवला आहे.

वडार समाजाच्या श्रीमंत मानाच्या अय्या गणपतीला वर्षांचा १०० वर्षाचा इतिहास आहे. कै. ह.भ.प लक्ष्मण महाराज यांनी गणेश उत्सवास सुरुवात केली. त्यानंतर समाजातील युवा पिढीनं पुढाकार घेतला 'एक गांव एक गणपती' ही संकल्पना रुजावी; समाजात एकी नांदावी म्हणून अय्या गणपती मंडळाची स्थापना केली. २०१८ मध्ये सीए. सुशील बंदपट्टे यांनी आय्या गणपती मंडळाला १८ फुटी गणेशमुर्ती, रथ आणि मुर्ती ठेवण्यासाठीच मंदिर तयार करून दिले होते. त्यावेळी बाप्पाला चांदी देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला होता. तो मानस यंदा गणेशमूर्तीस फुट ७ इंच रुंदी असलेला आणि ३७ इंच घेर असलेला चांदीचा किरीट आणि प्रभावळ अर्पण करण्यात आला आहे. विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून बंदपट्टे यांनी आपल्या कामाचा ठसा उमठवला आहे. युवा पिढीचे त्यांच्या मागे आहे. दहीहंडी लोन मेळावाच्या माध्यमातून उद्योजक निर्माण केले आहेत. समाजातील शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप या माध्यमातून समाजकार्यत नेम्ही अग्रेसर असतात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिल कुमार शिंदे आणि आ. प्रणिती शिंदे यांचे ते कट्टर समर्थक आहेत.




**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
पत्ता- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१ नगर अभियंता कार्यालय, नागरी कामे.
ई-मेल -smcaecivilworks@gmail.com मो. ७७४४००९९७९
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिकेमार्फत श्री. गणेश मुर्ती विसर्जन २०२३ करिता शहरातील सर्व नागरिक विविध गणेश उत्सव मंडळ यांना खालील नमुद ठिकाणी विसर्जन ठिकाणे/विहीर/कुंडामध्ये व्यवस्था करणेत आलेली आहे. या व्यतिरिक्त ज्या श्री. गणेश भक्तांना श्री. गणेश मुर्ती विसर्जनासाठी संकलन केंद्रामध्ये जमा करावयाच्या आहेत. त्यांच्याकरिता श्री.गणेश मुर्ती संकलन केंद्राची व्यवस्था सोलापूर महानगरपालिकेकडून करणेत आलेली असून, त्यांची माहिती वर्तमान पत्रात संक्षिप्तपणे देणेत आलेली आहे.

| अ. क्र. | विभागीय कार्यालय क्र. | श्री.गणेश मुर्ती विसर्जन ठिकाण/कुंड/विहीरी | अ. क्र. | विभागीय कार्यालय क्र. | श्री.गणेश मुर्ती विसर्जन ठिकाण/कुंड/विहीरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ | गणपती घाट | ७ | ०५ | रामलिंग नगर विहिर |
| २ | ०१ | कल्याणी कुंड (पठाणबाबा दर्गा)/ विष्णू घाट | ८ | ०६ | विष्णू मिल विहिर |
| ३ | ०२ | म्हाडा विहिर विडी घरकुल | ९ | ०६ | बसवेश्वर नगर विहिर (श्री अक्कलकोटे) |
| ४ | ०२ | हिप्परगा येथील खाण | १० | ०८ | अशोक चौक, पोलिस मुख्यालय विहिर |
| ५ | ०३ | एमआयडीसी ओपन स्पेस प्रिसिजन फॅक्ट्री जवळ (१-कृत्रिम कुंड) | ११ | ०८ | मार्कंडेय उद्यान विहिर |
| ६ | ०५ | कंबर तलाव- (३ कृत्रिम कुंड) | १२ | ०८ | सुभाष उद्यान विहिर |

सही/- शीतल तेली-उगले (भा.प्र.से) आयुक्त, सोलापूर महानगरपालिका



**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
पत्ता- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१ नगर अभियंता कार्यालय, नागरी कामे.
ई-मेल -smcaecivilworks@gmail.com मो. ७७४४००९९७९
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिकेमार्फत श्री. गणेश मुर्ती विसर्जन २०२३ करिता श्री.गणेश मुर्ती विसर्जन अनुषंगाने विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ मध्ये श्री.गणेश मुर्तीचे संकलन करुन श्री.गणेश विसर्जन सोलापूर महानगरपालिके मार्फत करणेत येणार आहे. तरी सार्वजनिक गणेश मंडळ व नागरिकांना आवाहन करणेत येते की, त्यांनी श्री.गणेश मुर्ती आपापल्या कार्यक्षेत्रातील नजिकच्या खालील नमुद संकलन केंद्रात आणून द्यावी. तसेच ज्या गणेश भक्तांना व गणेश उत्सव मंडळ यांना विसर्जन ठिकाण/विहीर/कुंडामध्ये करावयाचे आहे. त्यांनी विसर्जन ठिकाण/विहीर/कुंडामध्ये विसर्जन करणेचे व्यवस्था सोलापूर महानगरपालिकेकडून केली आहे.

**विभागीय कार्यालय क्र. १**

| अ. क्र. | श्री गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण | | |
|---|---|---|---|
| १ | सो.म.पा. शाळा नं.२१, बुधवार पेठ | ७ | सो.म.पा. शाळा क्र.७, चौपाड |
| २ | वडार गल्ली समाज मंदिर | ८ | सो.म.पा. शाळा क्र.९, पत्रा तालीम |
| ३ | चंडक शाळा, बाळे | ९ | विठ्ठल मंदिर, जुनी पोलीस लाईन |
| ४ | जिल्हा परिषद शाळा, वारद फार्म | १० | शरदचंद्र पवार प्रशाला, उमा नगरी |
| ५ | प्रसन्न हॉल, वसंत विहार | ११ | हुतात्मा स्मृती मंदिर |
| ६ | इंदिरा कन्या प्रशाला, शिंदे चौक | १२ | डॉ.कोटणीस स्मारक, भैय्या चौक |

**विभागीय कार्यालय क्र. २**

| अ. क्र. | श्री गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण | | |
|---|---|---|---|
| १ | रोशन प्रशाला | ५ | संभाजीराव शिंदे प्रशाला |
| २ | अंबिका समाज मंदिर, राजीव किसाननगर | ६ | राज मेमोरियल इंग्रजी शाळा |
| ३ | नागनाथ अल्ली महाराज | ७ | जिल्हा परिषद शाळा, शेळगी |
| ४ | पिरॅमीड हॉल, बी-ग्रुप विडी घरकुल | ८ | जोशी गल्ली, रविवार पेठ |

**विभागीय कार्यालय क्र. ३**

| अ. क्र. | श्री गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण | | |
|---|---|---|---|
| १ | एम.आय.डी.सी.प्रिसिजन कारखानाजवळ, भुखंड क्र. ६ व ७ खुली जागा | ६ | पावन गणपती, कर्णिक नगर |
| २ | जय भवानी प्रशाला, भवानी पेठ | ७ | एम.आय.डी.सी. आरोग्य निरिक्षक ऑफिस |
| ३ | विभागीय कार्यालय क्र.३ | ८ | राजेश्वरी शाळा, निवारा नगर |
| ४ | रविवार पेठ मराठी शाळा क्र.८, विभागीय कार्यालय क्र.२ जवळ | ९ | विनोबा भावे झोपडपट्टी येथील ललीतांबा मंदिर |
| ५ | गांधी नगर नं.२ येथील समाज मंदिर | १० | ढोर गल्ली मनपा शाळा |

**विभागीय कार्यालय क्र. ४**

| अ. क्र. | श्री गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण | | |
|---|---|---|---|
| १ | मार्कंडेय नगर, जिल्हा परिषद शाळा | ६ | जि.प. शाळा, निलम नगर |
| २ | माधव नगर, पद्ममारुती मंदिर | ७ | साने गुरुजी प्रशाला, |
| ३ | बुर्ला मंगल कार्यालय | ८ | |
| ४ | गणेश मंदिर, बोमड्याल शाळेजवळ | ९ | |
| ५ | बोल्ली मंगल कार्यालय, अशोक चौक | | |

**विभागीय कार्यालय क्र. ५**

| अ. क्र. | श्री गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण | | |
|---|---|---|---|
| १ | राजस्व नगर सांस्कृतिक भवन | ८ | मातोश्री रखुमाबाई हत्तुरे मंगल कार्यालय |
| २ | प्रगती लॉन्स | ९ | हत्तुरे मंगल कार्यालय |
| ३ | अर्थव मंगल कार्यालय | १० | मारुती मंगल कार्यालय |
| ४ | किल्लेदार मंगल कार्यालय | ११ | कुसुमराज मंगल कार्यालय |
| ५ | बालाजी मंगल कार्यालय | १२ | समृध्दी गार्डन |
| ६ | गोविंदश्री मंगल कार्यालय | १३ | पोस्ट बेसीक शाळा, विजापूर रोड |
| ७ | शिवदारे कॉलेज | | |

**विभागीय कार्यालय क्र. ६**

| अ. क्र. | श्री गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण | | |
|---|---|---|---|
| १ | सुंदराबाई डागा प्रशाला, दमाणी नगर | ४ | जांबमुनी समाज मंदिर, सोनी नगर |
| २ | जि.प.शाळा, देगांव | ५ | उत्कर्ष नगर मनपा शाळा |
| ३ | थोबडेवस्ती समाज मंदिर, थोबडेवस्ती | ६ | मनपा शाळा क्र.२८, सुंदरम नगर |

**विभागीय कार्यालय क्र. ७**

| अ. क्र. | श्री गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण | | |
|---|---|---|---|
| १ | नियोजन भवन | ५ | मनपा उर्दू शाळा क्र.३ |
| २ | प्र.क्र.१६ मोदी शाळा, बिगबाजार समोर | ६ | मनपा मराठी शाळा क्र.३, दक्षिण कसबा |
| ३ | मनपा रामवाडी शाळा | ७ | शिवानुभव मंगल कार्यालय |
| ४ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, एम्प्लॉयमेंट चौक | | |

**विभागीय कार्यालय क्र. ८**

| अ. क्र. | श्री गणेश मूर्ती संकलन करण्याचे ठिकाण | | |
|---|---|---|---|
| १ | जोडबसवण्णा चौक, शाळा नं.६ | १० | म.बेकरी शास्त्रीनगर समाज मंदिर महादेव मंदिर |
| २ | पोलीस मुख्यालय लगत एमपीएससी अभ्यास केंद्र | ११ | वॉर्ड ऑफिस नल्लामंदु |
| ३ | वॉर्ड ऑफिस म्हेत्रे | १२ | गणेश मंदिर हॉल, विकास नगर पोस्टल कॉलनी परिसरात |
| ४ | सुभाष उद्यान विहीरीलगत | १३ | कॅम्प शाळा |
| ५ | बालाजी मंदिर मुर्गीनाला भाजी मार्केट | १४ | शास्त्री नगर तायम्मा मंदिर |
| ६ | इनडोअर स्टेडियम अश्विनी हॉस्पीटलजवळ | १५ | जांबमुनी समाज मंदिर, अलकुंट चौक |
| ७ | वसंतराव नाईक शाळा | १६ | ५ नं. शाळा, भारतरत्न इंदिरा नगर |
| ८ | लोधीगल्ली शाळा नं.१४ जवळ समाजमंदिर | १७ | बापुजी नगर हनुमान मंदिर |
| ९ | सतनाम चौक, ललीत कला केंद्र | १८ | ७० फुट रोड मस्जीद जवळ, समाज मंदिर (गेंट्याल टॉकीज रोड) |

सही/- शीतल तेली-उगले (भा.प्र.से) आयुक्त, सोलापूर महानगरपालिका



## रंगवर्धन उपक्रमात यादव यांच्या हास्य विनोदाने आणली रंगत

**सोलापूर** : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूर यांच्या वतीने सुरू असलेल्या रंगवर्धन या उपक्रमात माणिक यादव यांच्या एकपात्री नाट्यप्रयोगाचे सादरीकरण मोदी येथील परिषदेच्या कै.पद्माकर देव सभागृहात झाले. हास्य ही माणसाला मिळालेली अमूल्य देणगी आहे. त्यामुळे आपण सतत हसत व आनंदी राहिले पाहिजे, असा संदेश देत माणिक यादव यांनी आपल्या कार्यक्रमातून विविध सामाजिक व राजकीय विषयांवर हास्य विनोदाच्या माध्यमातून बोचरी टीका केली. आपल्या शैलीदार सादरीकरणातून त्यांनी सर्व रसिकांची मने जिंकली. प्रारंभी ज्येष्ठ साहित्यिक व माजी प्राचार्या डॉ.नसीम पठाण यांच्या हस्ते माणिक यादव यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व आभार परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे यांनी केले. याप्रसंगी नाट्य परिषदेचे ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, व्यंकटेश रंगम, सुनील गुरव, मारुती कटकधोंड, वसिष्ठ सोनकांबळे, नंदकुमार सद्गुरे, हिरालाल धुळम, सुनंदा शेंडगे, आदी मान्यवर उपस्थित होते.



## उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या जयंती निमित्त वृक्षारोपण

**सोलापूर** : कै.उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या जयंती निमित्त श्री क्षेत्र आनंदी गणेश येथील बॉटनीकल गार्डन येथे औषधी झाडांचे रोपण शिवशंकर बझारच्या चेअरमन डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पं.स.चे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, देवन्या मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, ॲड.नितीन खराडे, राजेंद्र घोरपडे, भिमराव रेडे, तानाजी भगत, सोमनाथ मुंडफणे, अनिल जाधव, विनायक केचे, तानाजी भोळे, भाऊ पवार, राजु चव्हाण, गणेश निंबाळकर, दिपक शेंडगे, विराज निंबाळकर, विनायक पराडे, शिवशंकर बझारचे व्यवस्थापक गोपाळराव माने-देशमुख, शिवरत्न कन्स्ट्रक्शनचे नरसिंह करडे, अनिल उघडे, राहुल बोबडे, प्रकाश गायकवाड, प्रितम एकतपुरे, मनोज क्षीरसागर, नागेश बनकर, सचिन नरसाळे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.तत्पूर्वी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व उपस्थित मान्यवरांनी श्री क्षेत्र आनंदी गणेश येथील उद्योग महर्षि कै.उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या शक्तिस्थलावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.



## जि. प. शाळा शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी प्रकाश गव्हाणे

**विरवडे बु** : विरवडे बुद्रुक तालुका मोहोळ येतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी प्रकाश गव्हाणे तर उपाध्यक्ष पदी तानाजी चव्हाण यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. समितीच्या सदस्य पदी हर्षा चटके, ज्योती आवताडे,रेश्मा आवताडे,अतुल जगताप,शरद आवताडे,गोपाळ पाटील, समाधान आवताडे,बाळू आवताडे,अनिल पवार, मनोरमा कांबळे, रेश्मा शेख आदींची निवड करण्यात आली तर शिक्षक सचिव मजहारुनिसा मोमीन, शिक्षक सदस्य संगीता साळुंखे, रंजीत आवताडे, ग्रा.पं.सदस्य अनिता आवताडे यांची निवड करण्यात आली यावेळी अशोक आवताडे, नरसिंह पाटील, प्रकाश आवताडे, दिनकर पवार, संदीप आवताडे, अंकुश आवताडे, दिलीप पाटील, उमेश आवताडे, रमेश आवताडे, वसंत पाटील, प्रकाश तुळशीराम आवताडे, बापू गव्हाणे मोहोन चटके, जयदीप गव्हाणे, विवेक पाटील, अमोल आवताडे ,अनिकेत आवताडे, समाधान आवताडे, संताजी बेद्रे, ज्ञानेश्वर पाटील ,सलिम शेख व शिक्षक, पालक उपस्थित होते.



## मशरूम गणपतीतर्फे निंबाळकर यांचा सत्कार

**उ. सोलापूर** : वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानीक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामींणचे सुरेश निंबाळकर यांनी तळे हिप्परगा येथील श्री मशरूम गणपती येथे भेट दिली यावेळी भक्त मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी गणपती मंदिराचा कळस चोरी होऊन वर्षे होऊन गेले अद्याप चोर व कळस सापडत नाही,गेलेला कळस जवळपास सात लाखाचा असून तो मिळवून द्यावा अशी ही मागणी करण्यात आली. यावेळी पुजारी संजय पतंगे, भक्त मंडळाचे अध्यक्ष राजू हौशेट्टी, उद्योगपती अविनाश ठेंगील, काशिनाथ गड्डम, पीएसआय शैलेश खेडकर, नीलकंठ जाधवर, बापू शिंदे, हरिदास पांढरे उपस्थित होते.

## मोटोजीपी भारत पॉवरिंगद्वारे रेसिंग टीम

**मुंबई** : मोबिल २२ ते २४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत भारताच्या २०२३ ग्रँड प्रिक्ससाठी बुद्ध इंटरनॅशनल सर्किटमध्ये पदार्पण करत प्रथमच मोटोजीपी भारत येथे रेड बुल केटीएम फॅक्टरी रेसिंग टीमला टर्बो-पॉवर करत आहे.एक्सॉनमोबिल आणि रेड बुल केटीएम फॅक्टरी रेसिंग टीम यांच्यातील जागतिक भागीदारी साजरी करताना,ऑस्ट्रेलियन जॅक मिलर आणि दक्षिण आफ्रिकेचा ब्रॅड बाइंडर या दोन रायडर्सचा ॲड्रेनालाईन-पंपिंग शोडाऊन,ज्यांच्यासाठी जिंकणे हे दुसरे स्वरूप आहे,त्यांनी जागतिक स्तरावरील सर्किट्समध्ये त्यांचे कौशल्य आणि पराक्रम दाखवून दिले.

## सोलापूर गणेश दर्शन



सिद्धेश्वर गणेशोत्सव मंडळ कसबा चौक



जय हिंद चौक तरुण मंडळ नवी पेठ



किल्ला वेस गणपती सावरकर मैदान



सर्व शांती युवा प्रतिष्ठान विजापूर नाका

### पंढरपूर तालुक्यातील धनगर समाज आक्रमक

## सलग पाच दिवस रास्ता रोको; सोनके येथून झाली सुरुवात

सुराज्य/पंढरपूर

धनगर समाजाच्या आरक्षण प्रश्नासाठी पंढरपूर तालुक्यातील धनगर समाज आक्रमक झाला आहे. याचाच एक भाग म्हणून सलग पाच दिवस तालुक्यातील प्रमुख रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन सुरू राहणार आहे. यामध्ये रविवारी सोनके येथे भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात येऊन आरक्षण मिळावी आशी मागणी केली. या आंदोलनात विविध राजकीय पक्षाचे जोडे बाहेर सोडून सर्व धनगर समाज आंदोलनात सहभागी झाल्याचे दिसून आले.

सोमवारी कासेगाव येथील चौथा मैलावर तर मंगळवारी भाटुंबरे अहिल्या



चौकात आणि बुधवारी नारायण चिंचोली जवळ होणार रस्ता रोको होणार आहे. शुक्रवारी अखेरच्या दिवशी चक्क शेळ्या, मेंढ्या, आणि इतर पाळीव जनावरे सोबत घेऊन काढणार तहसील कार्यालयावर तालुका आणि शहरातील धनगर समाज यांचा भव्य मोर्चा निघणार आहे. धनगर समाजाचा एसटी आरक्षण अंबलबजावणीसाठी रविवारी पंढरपूर कराड राज्य मार्गावर, सोनके इथे तालुका पंढरपूर येथे रास्ता रोको येथे करण्यात आला. त्यावेळी समाजाच्या तीव्र भावना होत्या. यावेळी सहकार शिरोमणी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन भारतनाना कोळेकर, पांडुरंग परिवाराचे नेते तानाजीभाऊ वाघमोडे, राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य लक्ष्मण हाके, धनगर आरक्षण कृती समितीचे सदस्य परमेश्वर कोळेकर, विठ्ठलनाना पाटील, शालिवाहन कोळेकर, समन्वय समितीचे पंढरपूर तालुक्याचे अध्यक्ष पंकज देवकाते , दादा कोळेकर, प्रशांत घोडके, संतोष बंडगर, नितीन काळे, महेश शेडगे, संजय माने, बालाजी पाटील, माऊली हळणवर, धनाजी मामा खरात, संजय लवटे, म्हाळाप्पा खंडेकर, शासनाच्या वतीने नायब तहसीलदार श्री बुचके साहेब यांनी निवेदन स्वीकारले पोलीस प्रशासन व समाजाचे आभार आदित्य फत्तेपूरकर यांनी मांडले.

### आता माघार नाहीः नेत्यांचा इशारा

कोणत्याही शासनावर आमचा विश्वास नाही जोपर्यंत हातात एसटी अंमलबजावणीचे आदेश पडत नाही. तोपर्यंत माघार नाही. त्यामुळे हा आंदोलनाचा मार्ग अवलंबिला असल्याचेही यावेळी धनगर समाजातील नेत्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

### पक्षाच्याविरोधात पोस्ट करणे भोवले

## काँग्रेसच्या शहर सचिवांची पक्षातून हकालपट्टी

सुराज्य/सोलापूर

पक्षाच्या विरोधात सोशल मीडियातून पोस्ट टाकणे काँग्रेसचे सोलापूर शहराचे सचिव राजन कामत यांना चांगलेच भोवले आहे. पक्षशिस्त मोडल्याप्रकरणी पक्षाचे सोलापूर शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी कामत यांची काँग्रेसमधून हकालपट्टी केली आहे.

सोलापूर शहर सचिव राजन कामत मात्र सोशल मीडियाच्या माध्यमातून पक्षाच्या विरोधात काही ना काही पोस्ट टाकत होते. काँग्रेसचे शहराध्यक्ष नरोटे यांच्या ही गोष्ट लक्षात आल्यानंतर त्यांनी कामत यांना त्याबाबत खुलासा करण्याची नोटीस शनिवारी दिली होती. त्यात त्यांनी २४ तासांत खुलासा करावा, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असेही म्हटले होते.

त्यानंतरही कामत यांनी रविवारपर्यंत खुलासा दिला नव्हता, त्यामुळे नरोटे यांनी वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून कामत यांच्या हकालपट्टीचा निर्णय जाहीर केला आहे. पक्षाची शिस्त मोडणे, पक्षाच्या अनुशासन नियमांविरुद्ध काम केल्याच्या कारणावरून सोलापूर शहर काँग्रेसचे सचिव राजन कामत यांना पक्षातून बडतर्फ करण्यात आले आहे. कामत यांच्या माध्यमातून नरोटे यांनी पक्षाच्या विरोधात बोलणाऱ्या पदाधिकाऱ्यांना एक प्रकारे इशारा दिल्याचे बोलले जात आहे.

### पक्षविरोधी करणाऱ्यांची गय करणार नाहीः नरोटे



काही जण काँग्रेस भवनात दररोज येतात. पण बाहेर आल्यावर पक्षविरोधी वक्तव्य करतात. अशा कार्यकर्त्यांनाही शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी तंबी दिली आहे. आगामी काळात असे घडले आणि त्याचे पुरावे माझ्याकडे आल्यास कितीही मोठा पदाधिकारी असला तरी त्याची गय केली जाणार नाही, कारवाई केली जाईल, असेही नरोटे यांनी सांगितले.

### राजन कामत देणार उत्तर



पक्षातून हकालपट्टी केलेले राजन कामत एक-दोन दिवसात चेतन नरोटे यांना उत्तर देणार असल्याची माहिती आहे. त्यादृष्टीने ते तयारी करत आहेत. ते आता काय भूमिका घेणार याकडे काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## पिलीव परिसरात जोरदार पावसाची अपेक्षा

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात गेल्या काही दिवसांपासून थोडाफार पाऊस पडत आहे खरे पण अद्यापही या भागात जोरदार पाऊस पडला नाही. शेतकरी जोरदार पावसाची अपेक्षा व्यक्त करत आहेत.



सध्या याठिकाणी पावसाचे वातावरण आहे पण याठिकाणी जोरदार पाऊस पडणे अपेक्षित आहे. सध्या या भागात पिक पाणी चांगले आहे थोडाफार पाऊस पडत आहे पण या भागात अद्यापही समाधानकारक पाऊसच पडला नाही ओढे,नाले,बंधारे कोरडेच आहेत. जोरदार पाऊस पडला नसल्यामुळे ओढे ,नाले वाहीलेच नाहीत. यामुळे खरेतर पुढचे उन्हाळयाचे दिवस कसे जाणार असा प्रश्न पडला आहे. पाऊसच जर पडला नाही तर पिण्याच्या पाण्याचा तसेच शेतीच्या पाणयाचा प्रश्न गंभीर बनला आहे . त्यामुळे पिलीव परिसरातील शेतकरी जोरदार पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

### उद्योग बँक गणेशोत्सव व्याख्यानमाला

## 'एआय' मशीनमध्ये मानवामधील गुणदोष येऊ शकतात : डॉ. कामत

सुराज्य/सोलापूर

सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा काळ सुरू झाला आहे. या 'एआय' मशीन मध्ये मानवामधील गुणदोष येऊ शकतात. इगो, धर्मवाद, वर्णभेद तिरस्कार यासारखे इतर अनेक दोष येऊ शकतात. त्यामुळे जगभर यावर मोठ्या प्रमाणात संशोधन सुरू आहे. एलन मस्क यांनी किमान काही महिने आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर काम थांबवण्याचे आवाहन केले. यावर खूप संशोधन सुरू असून युवकांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू तथा डॉ. होमी भाभा स्टेट यूनिवर्सिटीचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले आहे.



उद्योग बँक माजी सेवक सांस्कृतिक मंडळ सोलापूर व सोलापूर रोटरी क्लब ऑफ एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गणेशोत्सव बौद्धिक व्याख्यानमालेत ते बोलत होते. रविवारी त्यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेत मानवी बुद्धिमत्तेचे स्थान' या विषयावर त्यांनी व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफले. व्याख्यानमालेचे यंदा ५८ वे वर्ष आहे.

या वेळी व्याख्यानमालेचे अध्यक्ष नवनाथ इंदापुरे तसेच प्रेसिडेंट यल्लादास लचमापुरे, रोटरीचे अध्यक्ष चार्वाक बुर्गूल, सचिव अशोक मांदवाद, श्रीनिवास सामलेटी, सिद्धेश्वर गड्डम, चार्वाक बुर्गुल, अशोक मांदवाद, पुंडलिक पगडीमल, गोवर्धन चव्हाण, अंबादास गड्डम, उज्वल सामलेटी, प्रणित बिंगी, बुचय्या गुंडेटी आदी उपस्थित होते.

## कासेगाव येथे कटरने हल्ला; चौघे जखमी

सुराज्य/सोलापूर

पत्नीला झालेले मुल हे आपले नाही असा संशय घेत सासुरवाडीत आलेल्या जावयाने तीक्ष्ण कटर आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून चौघांना जखमी केले.

ही घटना कासेगाव (ता. पंढरपूर) येथील महादेव नगरात शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली.या प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी अनिल महांतेश चव्हाण (रा.सांगली ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तो घटनेनंतर पसार झाला आहे. आरोपी अनिल चव्हाण याची पत्नी राजश्री ही बाळंतपणासाठी माहेरी आली होती. शनिवारी अनिल चव्हाण हा कासेगाव येथे सासरी आला होता. आणि पत्नीला झालेले मूल हे माझे नाही. असा संशय घेऊन घरात भांडण सुरु केले. आणि सासू लक्ष्मी राजू पवार यांच्यावर कटरने हल्ला केला. त्यांच्या ओरडण्याच्या आवाजाने त्याची पत्नी राजश्री, मेहुणा विनायक आणि लखन पवार हे भांडण सोडविण्यास आले असतात त्यांच्यावर देखील चव्हाण याने लाथाबुक्या आणि कटरने मारहाण केला. त्यानंतर तो पसार झाला. अशा आशयाची फिर्याद लक्ष्मी राजू पवार यांनी जावया विरुद्ध दाखल केली . पुढील तपास हवालदार गायकवाड करीत आहेत.

### म्हैसलगी येथे कोयत्याने मारहाण

मालकाच्या शेतातील विजेच्या पोलवर टाकलेला आकडा काढून टाकल्याचा कारणावरून लाथाबुक्क्या आणि कोयत्याने केलेल्या मारहाणीत ३२ वर्षीय सालगडी जखमी झाला. ही घटना म्हैसलगी (ता.अक्कलकोट ) येथे शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी भीमाशंकर अंदप्पा खेडगी (रा. म्हैसलगी ) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे . या संदर्भात रावतप्पा भीमाशंकर सालोटगी (वय ३२ रा. म्हैसलगी ) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. काल दुपारच्या सुमारास त्यांच्या मालकाच्या शेतातील विजेच्या पोलवर कोणीतरी विज चोरी साठी आकडा टाकला होता. हे दिसून आल्यानंतर तो आकडा सालोटगी यांनी काढून टाकला होता. तेंव्हा आरोपी खेडगी हा हातात कोयता घेऊन खांबावरील आकडा कोणी काढला ? असे म्हणत त्यांना लाथाबुक्क्या आणि कोयत्याने मारहाण करून जखमी केले .अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार धनगोंडा पूढील तपास करीत आहेत.

## जि.प.तर्फे पंचायत समिती स्तरावर स्वच्छता रन-वे चे आयोजन

सुराज्य/सोलापूर

स्वच्छता पंधरवडा दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेच्या वतीने स्वच्छता ही सेवा पंधरवाड्या निमित्त स्वच्छता रन साठी सोलापूर जिल्हा धावला..! स्वच्छते साठी रविवारी जिल्ह्यात गटविकास अधिकारी यांचे सह कर्मचारी व ग्रामस्थ धावले .

पंचायत समिती उत्तर सोलापूरच्या वतीने शहरात स्वच्छता ही सेवा अंतर्गत स्वच्छता रन चे आयोजन करुन स्वच्छता ही सेवा कचरा मुक्त भारत अभियान राबविणेत आले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांचे मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य




कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे व पाणी व स्वच्छचा विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी व्हीसी घेऊन याबाबत नियोजन केले.

ग्रामस्थांमध्ये स्वच्छता (कुटुबस्तरीय व सार्वजनिक) ठिकाणी, शाळा, बस स्थानक, बॅक, बाजार, इत्यादी संस्थास्तरीय ठिकाणे नियमित स्वच्छतेसाठी जाणीव जागृती निर्माण होण्यासाठी स्वच्छता रन हे उपक्रम राबवण्यात आले.

उत्तर सोलापूर पंचायत समिती उत्तर सोलापूर च्या वतीने घेणेत आलेल्या स्वच्छता रन मध्ये गटविकास अधिकारी महेश पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, कृषि अधिकारी आर.पी. कांबळे, गट शिक्षण अधिकारी श्री निंबर्गी , सहाय्यक लेखा अधिकारी एस.बी. पाटील, विस्तार अधिकारी (पं) सोमनाथ शिंदे, विस्तार अधिकारी (कृषि) एस.आर. राठोड, आरोग्य विस्तार अधिकारी धत्तरगी, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष गंगाधर कांबळे, एन.पी.पाटील, के.के. डवले, तसेच एल.बी. बनसोडे वरिष्ठ सहाय्यक, तसेच पंचायत समिती उत्तर सोलापूर चे कर्मचारी समुह समन्वयक मोनिका दिनकर, समुह समन्वयक अम्रपाली गजघाटे, व अनंत सितापराव यांचे सह ग्रामपंचायत कर्मचारी व युवकानी सहभाग घेतला.

अक्कलकोट शहरात स्वच्छता रन काढण्यात आली. गटविकास अधिकारी सचिन खुडे, यांचे सह अधिकारी व कर्मतारी सहभागी झाले होते. पंचायत समिती करमाळा अंतर्गत ग्रामपंचायत झरे येथे स्वच्छता रन -वे गट विकास अधिकारी मनोज राऊत यांच्या मार्गदर्शनखाली आयोजन करण्यात आले. पंचायत समिती मंगळवेढा येथे गटविकास अधिकारी शिवाजीराव पाटील यांचे सह सर्व कर्मतारी व अधिकारी सहभागी झाले होते. दक्षिण सोलापूर तालुक्यात मंद्रुप येथे भारतीय स्वच्छता रन मध्ये ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला. गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, सरपंच अनिता कोरे, ग्रामविकास अधिकारी नागेश जोडमोटे यांचे सह ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# अतिक्रमण मोहिमेमुळे लँडलॉबी खूष

## छोट्या व्यावसायिकांना बसला फटका; कुटुंबियांवर उपासमारीची वेळ

सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट नगर परिषदेकडून तीर्थक्षेत्र विकासाच्या नावाखाली सध्या शहरातील अतिक्रमण काढण्याची मोहीम राबवली आहे. याचा फटका छोट्या व्यवसायिकांना बसला असून शेकडो लोकांचे व्यवसाय रस्त्यावर आले आहेत. शहरातील अतिक्रमण विरोधी मोहिमेचा फटका छोट्या व्यवसायिकांना बसला असताना शहरातील लँडलॉबीला मात्र, याचा फायदा झाल्याची जोरदार चर्चा नागरिकांसह छोट्या व्यवसायिकातून सुरू आहे.**

अक्कलकोट नगर परिषदेकडून शहरातील अतिक्रमण विरोधात मोहीम तीव्र करण्यात आली आहे. शहरातील कारंजा चौक, बस स्थानक परिसर, विजय कामगार चौक, ए वन चौक, कांदा बाजार, श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर, मेन रोड, जुना आडत बाजार आदींसह विविध ठिकाणचे नगर परिषदेच्या हद्दीतील खोके काढण्याचे काम नगर परिषदेकडून सुरू आहे. तीर्थक्षेत्र विकासाच्या नावाखाली छोट्या व्यवसायिकांना ऐन सणासुदीच्या काळामध्ये रस्त्यावर आणण्याचे काम नगरपरिषदेकडून सुरू आहे. याला छोट्या व्यावसायिक खोकेधारकांनी विरोध केला. अतिक्रमण काढण्याचा अगोदर अक्कलकोट नगर परिषदेकडून छोट्या व्यावसायिकांना अल्प दरात पर्याय जागा, छोटे मोठे गाळा देऊन मग अतिक्रमण काढायला पाहिजे होते, पण नगरपरिषद प्रशासन या गोरगरीब व्यवसायिकांचा विचार करावयास तयार नसल्याचे दिसत आहे.

### लँडलॉबीचा नगरपरिषद प्रशासनावर दबाव?

अक्कलकोट शहरात लँड लॉबी सक्रीय झाले असून मोक्याच्या जागा करोडो रुपये देऊन खरेदी करण्याचा सपाटा ही लॉबी करत आहे. गेल्या दोन-तीन वर्षातील अक्कलकोट शहरातील व परिसरातील जागांची खरेदी विक्रीची माहिती घेतली असता कोट्यवधी रुपयांच्या जागा काही ठराविक लँड लॉबीने खरेदी केल्याचे उघड झाले आहे. शहरातील मोक्याच्या जागा लँडलाबी खरेदी करून त्या जागेच्या आजूबाजूची ४०-५० वर्षांपासून असणारी छोटी खोकी, दुकाने काढण्यासाठी नगरपरिषद प्रशासनावर दबाव आणत असल्याची चर्चा नागरिकांतून व छोट्या व्यवसायिकातून सुरू आहे.

### विविध संघटना व पक्ष गप्प

नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी कारवाईमुळे छोट्या व्यावसायिकांना फटका बसला असून त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे लक्ष देण्याची मागणी छोट्या व्यवसायिकांमधून केली जात आहे. अक्कलकोट शहरात अतिक्रमण विरोधी मोहीम सुरू असताना या ठिकाणच्या विविध संघटना व विविध पक्ष हे मात्र मूग गिळून गप्प बसले आहेत. तथाकथित नेते मंडळींच्या या भूमिकेबद्दल छोट्या व्यवसायिकातून संताप व्यक्त केला जात आहे. नगरपरिषदेच्या अतिक्रमण विरोधी कारवाईमुळे लँडलाबीमध्ये खुशी तर छोट्या व्यवसायिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.



पाऊस नसल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना सर्वत्र नागरिक हे हवालदिल झाले आहेत. अशा भीषण परिस्थितीमध्ये गोरगरिबांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम नगरपरिषदेकडून सुरू आहे. नगर परिषदेने रहदारी व वाहतुकीस अडथळा ठरणारे अतिक्रमण आवश्य काढावे पण ज्या ठिकाणी कोणताच अडथळा नाही अशा ठिकाणची अतिक्रमणे काढल्याने छोट्या व्यवसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. नगर परिषदेची अतिक्रमण विरोधी मोहिमेमुळे शहरातील लँडलाबी खुश झाल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

# मिळणाऱ्या विजयापेक्षा स्पर्धेत सहभागी होणे महत्त्वाचे : प्रा. डॉ. मिसाळ

सुराज्य/सोलापूर




आपल्या भारत देशाला 'सुपर पॉवर'च्या पातळीवर आणण्यासाठी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे योगदान महत्वाचे असून यासाठी 'ऑलम्पस' सारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा सातत्याने होणे अत्यंत गरजेचे आहे. या स्पर्धेमुळे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नवनवीन गोष्टी शिकण्याची सुवर्णसंधी मिळते. सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना अधिकाधिक आव्हाने स्विकारण्याची तयारी ठेवावी लागणार आहे. स्पर्धेमध्ये विजयी होण्यापेक्षा सहभागी होणे हे अत्यंत महत्वाचे आहे, असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजिलेल्या 'ऑलम्पस २ के २३' या राष्ट्रीय स्पर्धेच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. प्रारंभी 'ऑलम्पस २ के २३' चे विद्यार्थी खजिनदार चेतन टमटम यांनी स्पर्धेसाठी बाहेरून आलेल्या स्पर्धकांचे स्वागत केले व 'ऑलम्पस २ के २३' ही स्पर्धा आयोजित करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती म्हणाले की, 'ऑलम्पस'मुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान मिळवण्याच्या संधी उपलब्ध होतात. यासाठी विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धेत सहभागी होणे गरजेचे आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून सुमारे ८०० हून अधिक स्पर्धक विविध २३ स्पर्धा प्रकारात सहभागी झाले होते. या स्पर्धेत जवळपास एक लाखांची बक्षिसे, स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्रे अशी बक्षिसे वितरीत केली तर रोख स्वरूपातील रक्कम विजेत्यांच्या बँक खात्यावर ऑनलाईन जमा करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वरी यादव व दिग्विजय बुरा या विद्यार्थ्यांनी केले तर ऑलम्पसचे विद्यार्थी उपाध्यक्ष दीपक शिंदे यांनी आभार मानले.



# कुचन प्रशालेस तेलुगू अभिनेता तनिकेळ भरणी यांची भेट

**सोलापूर** : पद्मशाली शिक्षण संस्था संचालित कुचन प्रशालेस तेलूगू अभिनेता श्री तनिकेल्ला भरणी यांनी गणेश उत्सवा निमित्त भेट देऊन प्रशालेतील गणेशाची आरती केली. उदरनिर्वाहासाठी सोलापूरात आलेला तेलुगु भाषिक एकत्र राहत आहेत. समाजासाठी पद्मशाली शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज एवढ्या मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालेले आहे, ही अतिशय अभिमानाची, गौरवाची गोष्ट असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गडम, सचिव दशरथ गोप, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाय गंजी, शालेय समिती अध्यक्ष श्रीधर चिट्याल, विश्वस्त दिनेश यन्नम, मधुकर कट्टा, व्यंकटेश आकेन, मल्लिकार्जुन सरगम, विजयकुमार गुल्लापल्ली, श्रीनिवास कटकूर, रमेश केदारी, नागनाथ श्रीरामदास व सर्व विश्वस्त मंडळ तसेच प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दतात्रय मेरगू, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# आरक्षणासाठी रास्ता रोको

**पिलीव** : धनगर समाजाचा अनुसुचित जमातीत समावेश करावा याची ताबडतोब अमंलबजावणी करावी, यासाठी सकल धनगर समाजातर्फे अहिल्यादेवी चौकात रविवारी रास्तारोकोचे आयोजन करण्यात आले आहे. चौंडी येथे धनगर समाजाचे गेल्या अनेक दिवसांपासून आमरण उपोषण सुरु आहे. मात्र,शासनाने याची कसल्याही प्रकारची दखल घेतली नाही या समाजबांधवाना पाठींबा म्हणून धनगर समाज बांधवांनी रास्ता रोकोमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विसर्जन मिरवणुकीदिवशी वाहतूक मार्गात बदल

## पोलीस आयुक्तांनी काढले आदेश

सुराज्य/सोलापूर

गणेशोत्सवाच्या शेवटच्या दिवशी सोलापूर शहरातील प्रमुख आठ मध्यवर्ती महामंडळांकडून विसर्जन मिरवणूक काढली जाते. त्यावेळी मिरवणूक मार्गांवर मोठी गर्दी होते. सार्वजनिक वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मिरवणुकीचे मार्ग २८ तारखेला बंद राहणार आहेत. त्या मार्गांवरील वाहनांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिला जाणार आहे.



गणपती विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी सकाळी सहा ते रात्री १२ पर्यंत मार्गात बदल राहणार असल्याचे आदेश पोलिस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी काढले आहेत. त्यानुसार विजापूरहून पुणे किंवा हैदराबादकडे जाणाऱ्या वाहनांसाठी नवीन विजापूर नाक्यावरून नवीन बायपासमार्गे देगाववरून पुढे जाता येणार आहे. पुण्याकडून विजयपूरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी नवीन पूना नाका येथून बायपासमार्गे पुढे जाता येईल.

हैदराबादहून पुणे किंवा विजयपूरकडे जाणाऱ्या वाहनांना नवीन हैदराबाद नाका, जुना हैदराबाद नाका, मार्केट यार्ड, नवीन पूना नाका, नवीन केगाव बायपासमार्गे प्रवास करता येईल. रेल्वे स्टेशन, एसटी स्टॅण्डकडे ये-जा करण्यासाठी विजापूर नाका, आयटीआय पोलिस चौकी, निर्मिती विहार, सलगर वस्ती पोलिस ठाणे, मरिआई चौक, भैय्या चौक, रेल्वे स्टेशन, भैय्या चौक ते निराळे वस्तीमार्गे एसटी स्टॅण्ड असे जाता येईल. तसेच जुळे सोलापूरहून शहरात येणाऱ्या वाहनांना जुना तुळजापूर नाका, जुना बोरामणी नाका, अशोक चौकमार्गे प्रवास करता येणार आहे. बार्शीकडून शहरात येणाऱ्या वाहनांसाठी बार्शी रोड टोल नाका येथून खेडमार्गे केगाव ब्रिजमार्गे सोलापूर आणि शहरात जडवाहनांना मिरवणूक संपेपर्यंत बंदी राहणार आहे. या काळात मार्केट यार्ड चौक-जुना बोरामणी नाका-शांती चौक-अक्कलकोट रोड असा मार्ग सुरु राहणार आहे.

# आर्थिक फसवणूक करणाऱ्या सालगड्यास अटक




**सोलापूर** : तुमच्याकडे मी सालगडी म्हणून कामास राहतो, असे म्हणून विश्वास संपादन करून त्या बदल्यात इसारा रक्कम घेऊन पोबारा करणाऱ्या व एक नव्हे तर तब्बल ५ शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या सालगड्यास अखेर सदर बझार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली.

सुरेश धोंडीबा खंदारे ऊर्फ महादेव रोकडे (रा. चुंगी, ता. अक्कलकोट) असे त्या संशयित आरोपींचे नाव नाव आहे. सुरेश धोंडीबा खंदारे याने महादेव रोकडे असे नाव सांगून त्यांनी आतापर्यंत रमेश शेळके (रा. कोन्हेरी), लालसिंग जाधव (रा. कुमठे तांडा), पुरुषोत्तम शर्मा (रा. दस्तापुर), उमेश अवताडे (रा. विरवडे), आनंद क्षीरसागर (रा. लक्ष्मी पेठ, सोलापूर) अशा ५ शेतकऱ्यांकडून जवळपास २ लाखाची रक्कम गोळा केली. सुरेश खंदारे हा आपले नाव महावीर रोकडे असल्याचे सांगून प्रत्येक वेळी तो आपले ठिकाण व मोबाईल नंबर सतत बदलत असल्याने पोलिसांना तो मिळून येत नव्हता. सदर बझार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने या आरोपीच्या बदलत्या वास्तवाचा बारकाईने अभ्यास करून मांजरी पुणे येथे जाऊन शोधून त्यास ताब्यात घेतले. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्र क्षीरसागर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पोपटराव धायतोंडे, पोलीस उपनिरीक्षक सचिन माळी, पोलीस हवालदार औदुंबर आटोळे, सागर सरतापे, आयाज बागलकोटे, सागर गुंड, सोमनाथ सुरवसे, अर्जुन गायकवाड या पथकाने केली.

# करमाळा पोलिसांकडून ४५० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

**करमाळा** : शांततेत व उत्साही वातावरणात गणेशोत्सव साजरा व्हावा म्हणून करमाळा तालुक्यातील ४५० संशयित गुन्हेगारांवर पोलिसांकडून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये ३१ संशयित हे गंभीर गुन्ह्यातील आहेत गणेशोत्सवा दरम्यान कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांकडून खबरदारी घेतली जात आहे. त्यातूनच ही कारवाई करण्यात आली आहे. करमाळा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार यावर्षी १०५ गणेशोत्सव मंडळांनी परवानगी घेतली आहे. हा गणेशोत्सव आंनदी वातावरणात साजरा व्हावा यासाठी पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा शहरातील चौकाचौकात तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यावर्षी प्रथमच महिला पोलीसही बंदोबस्तासाठी तैनात आहेत.

या उत्सहात कोणताही अनुचित प्रकार घडू नये व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून ४५० संशयित गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून अंतिराम बॉन्ड घेण्यात आले आहेत. या कारवाईमध्ये ३१ जण हे गंभीर गुन्ह्यातील आहेत, असे सांगण्यात आले आहे.

# बिलाच्या उधारीवरून रॉडने मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर** : किराणा बिलाच्या मागील उधारीवरुन दगड रॉड व लाथाबुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकि दिल्या प्रकरणी तीन जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २१ सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास कमला नगर विजापूर रोड येथे घडली. याप्रकरणी प्रवीण काशिनाथ हावरे (वय-४०, रा. कमला नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून श्रीनिवास चव्हाण (तात्या), अतुल चव्हाण व लिंबाजी चव्हाण यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. प्रवीण हे त्यांच्या घराच्या गेट जवळ आले असता, किराणाची मागील उधारी बिलाच्या कारणावरून श्रीनिवास चव्हाण याने त्यांच्या कपाळावर रॉडने मारून जखमी केले. त्यानंतर अतुल चव्हाण यांनी फिर्यादी यांच्या पाठीत दगड मारून जखमी करत फिर्यादी यांची पत्नी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून वरील संशयित सर्व आरोपींनी मिळून फिर्यादीस व फिर्यादी यांच्या पत्नीला जीवे मारण्याची धमकि दिली असल्याचे फिर्यादित म्हटले आहे. पुढील तपास पोलीस नाईक शेळके हे करीत आहेत.

# रेल्वे गाडीखाली सापडून अनोळखी पुरुषाचा मृत्यू

**सोलापूर** : जेऊर रेल्वे स्टेशन दरम्यान दि. २१ रोजी रात्री८ वाजताच्या पूर्वी अनोळखी पुरुष अंदाजे वय ५० कोणत्यातरी रेल्वे गाडी खाली सापडून अन्यथा गाडीतून पडून मृत्यू झाला आहे.

रंग काळा सावळा, उंची ५ फूट ६ इंच, अंगाने मजबूत, नाक बसके मोठे, चेहरा गोल, डोक्याचे केस काळे पुढे टक्कल पडलेले, मिशा दाढी नाही, कपडे लाल रंगाचा टी-शर्ट, फिकट निळ्या रंगाची रेडिमेट पॅन्ट आतमध्ये इसा कंपनीची निळ्या रंगाची अंडरवियर व कमरेला करदोडा घातलेला आहे. तरी अशा वर्णनाचा पुरुष व्यक्तिस कोणी ओळखत असल्यास कुर्डूवाडी रेल्वे पोलीस ठाण्यात संपर्क करण्याचे आवाहन पोलीस हवालदार एस. एन. इनामदार यांनी केले आहे.

# घरफोडी करणाऱ्या दोघांना पकडले; ४७ हजारांचा माल ताब्यात

सुराज्य/सोलापूर

एमआयडीसी पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची धडाकेबाज कामगिरी करीत घरफोडी करणाऱ्या दोन सशंयित आरोपींच्या ४ तासात मुसक्या आवळल्या व त्यांच्या ताब्यातून ४७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत होणाऱ्या घरफोड्या, वाहन व मोबाईल चोरी रोखण्याकरिता पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त विजय कबाडे व सहा. पोलीस आयुक्त विभाग १ संतोष गायकवाड यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक एमआयडीसी पोलीस ठाणे राजन माने यांना गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले होते. गणेशोत्सवच्या अनुषंगाने पेट्रोलींग करीत असताना पो. कॉ. अमर शिवसिंगवाले यांना गुप्त बातमीदाराने स्वागतनगर जवळ ताई चौकात बांधकामकरिता लागणाऱ्या मशिनरी विक्रीकरीता ३ जण येऊन थांबले असल्याचे सांगीतले. त्यानुसार त्या ठिकाणी सापळा लावून त्यांना ताब्यात घेत असताना त्यातील १ जण पळून गेला व इतर दोघास ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील कुमठा नाका येथील रोशन सॅनिटरी हार्डवेअरचे दुकानात रात्री चोरी केल्याचे कबुली दिली आहे. त्यांनी आपली नावे युवराज बन्सी चौधरी (वय-४५, रा. बेडर पुल, लष्कर, सोलापूर), रमजान बशीर शेख, (वय-२८, रा. भारत रत्न इंदिरा नगर, सोलापूर) अशी सांगितली. केवळ चार तासात २ आरोपींना अटक करून ४७ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.हि कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने, पो. नि. शिवशंकर बोंदर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उप. नि विक्रम रजपूत यांच्यासह राकेश पाटील, एकनाथ उबाळे, दिपक डोके, सचिन भांगे, मंगेश गायकवाड, शैलेश स्वामी, अमोल यादव, सुहास अर्जुन, काशिनाथ वाघे, शंकर याळगी, अमर शिवसिंगवाले, भारत तुक्कुवाले, दिपक नारायणकर, अमसिध्द निंबाळ, देविदास कदम यांनी बजावली.

# राजेंद्र शिंदे गुणवंत प्राचार्य पुरस्काराने सन्मानित



**सोलापूर** : छत्रपती शिवाजी ज्यु. नाईट कॉलेजचे प्राचार्य राजेंद्र शिंदे यांना गुणवंत प्राचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधत पुणे शहर जिल्हा लोकशाही आघाडी व माध्यमिक शिक्षक संघ यांच्यातर्फे नाशिकचे माजी शिक्षक आमदार नानासाहेब बोरसे यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य शिक्षक आघाडीचे सचिव हिरालाल पगडाल यांची प्रमुख उपस्थित शिंदे यांना हा पुरस्कार प्रधान करण्यात आला. स्मृतीचिन्ह शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या कार्यक्रमास पुणे शहर शिक्षक संघाचे अध्यक्ष सुजित जगताप यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व मान्यवर नागरिक उपस्थित होते.

या पुरस्काराबद्दल प्राचार्य शिंदे यांचे संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अनिल बारबोले मुख्याध्यापिका सुजाता जूगदार कॉलेज कर्मचारी युनियन अध्यक्ष दत्ता भोसले आदींनी अभिनंदन केले आहे.

# विद्यापीठाची नोव्हेंबरमध्ये सत्र परीक्षा पुढील महिन्यात अर्ज भरण्यास प्रारंभ

सुराज्य/सोलापूर

सोलापूर विद्यापीठाची सत्र परीक्षा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. युवा महोत्सव झाल्यानंतर परीक्षेसाठी अर्ज भरायला प्रारंभ होईल, अशी माहिती परीक्षा विभागाकडून देण्यात आली.

कोरोनानंतर विस्कळित झालेले परीक्षेचे नियोजन आता सुरळीत करण्यासाठी विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, मार्च-एप्रिल महिन्यातील परीक्षांचे निकाल अजूनही पूर्णपणे लागलेले नाहीत.

संगणक विभागाने या परीक्षेत जवळपास दीड हजार विद्यार्थ्यांच्या निकालात त्रुटी (आरआर) असल्याचे स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाला त्यातील काही विद्यार्थ्यांची माहिती मिळत नसल्याने आता त्यांचा शोध घेतला जात आहे. त्यानंतर संपूर्ण निकाल जाहीर होतील आणि त्यानंतर युवा महोत्सव पार पडल्यानंतर पुढच्या सत्र परीक्षेसाठी अर्ज भरून घेतले जाणार आहेत.

नोव्हेंबरमध्ये म्हणजेच दिवाळीपूर्वी सत्र परीक्षा उरकण्याचे नियोजन झाले आहे. त्याअनुषंगाने दोन दिवसांपूर्वी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत तसा निर्णय देखील झाला आहे. परीक्षेचा निकाल ३० दिवसांत जाहीर करून पुन्हा एप्रिलमध्ये पुढील सत्र परीक्षा होईल, असेही नियोजन यावेळी झाले आहे.

सत्र परीक्षेपूर्वी किती अभ्यासक्रम शिकवून झाला आहे, विद्यार्थ्यांची परीक्षा कधी सुरु करू शकतो याची संपूर्ण माहिती महाविद्यालयांनाच असते. त्यामुळे वेळापत्रक ठरविणे, परीक्षा




घेऊन त्याचा वेळेत निकाल जाहीर होण्यासाठी उत्तरपत्रिकांची तपासणी करण्याची जबाबदारी महाविद्यालयांवर सोपविल्याचे विद्यापीठाने जाहीर केले होते. पण, अद्याप त्यासंबंधीचा अंतिम निर्णय झाला नसून, आगामी सत्र परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाकडूनच अंतिम करण्यात आले आहे.

सुराज्य Classified

● पाण्याच्या टाक्या धुणे (टॅन्क क्लीन) साठी अनुभवी कामगार पाहिजेत. संपर्क : देवस्थळी, घ. नं. ५६०/१३, विष्णू भुवन, दक्षिण सदर बझार, सोलापूर हौसिंग सोसायटी (अर्ज आणून द्यावा) (280923)

## महत्त्वाचे वृत्त...

### मुंबई विमानतळावर बॅगेत बॉम्ब ठेवल्याचा दूरध्वनी

**मुंबई** : मुंबई विमानतळावर निळ्या रंगाच्या बॅगमध्ये बॉम्ब ठेवल्याचे टर्मिनल २ येथे दूरध्वनी करून एका व्यक्तीने सांगितले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि आसपासची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. तपासणीत सुरक्षा कर्मचाऱ्यांना विमानतळ परिसरात काही संशयास्पद आढळले नाही. दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीबाबत पोलीस अधिक माहिती मिळवत आहेत. पोलीस सूत्रांनी सांगितले की, 'शनिवारी संध्याकाळी ६ वा. टी २ येथील अधिकाऱ्यांना एका निनावी दूरध्वनी आला.'

### पोलीस उपनिरीक्षकावर ब्लेडने हल्ला

**मुंबई** : कफ परेड येथे पोलीस उपनिरीक्षकावर ब्लेडने वार करण्यात आल्याची घटना घडली. आरोपीविरोधात यापूर्वी अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याची मानसिक स्थिती ठीक नसल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस उपनिरीक्षक रुपेशकुमार भागवत कफ परेड पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. आरोपी गुलाम मुस्तफा शेख वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावेळी त्याला ताब्यात घेण्यासाठी पोलीस पथक गेले असता आरोपी शेखने ब्लेड काढले. जवळ आल्यास मारून टाकेन, अशी धमकी दिली. त्यानंतर शेखने भागवत यांच्या दिशेने ब्लेड फिरवण्यास सुरूवात केली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असता त्याने ब्लेडने हल्ला केला.

### घरे देण्याच्या आमिषाने ३० जणांची फसवूणक

**पुणे** : म्हाडाच्या पुनर्वसन योजनेत घर मिळवून देण्याच्या आमिषाने २५ ते ३० जणांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी रेखा उर्फ कलावती भगवान कांबळे, भगवान कांबळे (दोघे रा. नवीन म्हाडा वसाहत, हिंगणे मळा, हडपसर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शंकर दिनकर कांबळे (वय ६५, रा. जुना बाजार, मंगळवार पेठ) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी कांबळे आणि आरोपी दाम्पत्य नातेवाईक आहेत. आरोपींनी म्हाडा कार्यालयात कामाला असल्याची बतावणी कांबळे यांच्याकडे केली होती. म्हाडाच्या पुनर्वसन योजनेत घर मिळवून देण्याचे आमिष त्यांनी दाखविले होते. कांबळे यांच्याकडून त्यांनी १६ हजार रुपये घेतले. घर मिळवून देण्याच्या आमिषाने आरोपी कांबळे दाम्पत्याने २५ ते ३० जणांकडून पैसे घेतले होते.

### नाशिक जिल्ह्यातील कांदाप्रश्न 'जैसे थे'

**नाशिक** : नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापारी असोसिएशनने पुकारलेल्या बंदचा आज पाचवा दिवस असून आजही दिवसभर कांदा लिलाव ठप्प होते. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. दरम्यान आता महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्यावतीने बैठकीचे आयोजन केले आहे. जिल्ह्यातील लासलगाव कांदा बाजारपेठ आवारात बैठक होणार असून यानंतर कांदा उत्पादक शेतकरी संघटनेची भूमिका स्पष्ट केली जाणार आहे. एकीकडे बुधवारपासून जिल्ह्यातील कांदा व्यापारी संघटनाकडून बंद पुकारण्यात आला आहे. पालकमंत्री दादा भुसे आणि जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक होऊनही तोडगा निघालेला नाही.

### आठवड्यातून एक दिवस दप्तराविना शाळा

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेने सर्व १२८ शाळांमध्ये दर शनिवारी 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम सुरू केला आहे. या नावीन्यपूर्ण उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या खांद्यावरचा भार हलका झाला आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये आता गीत, कविता, गायन, प्रश्नमंजूषा, शाब्दिक खेळ, पाककला, चित्रकला, मैदानी खेळ असे विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेला, तसेच पर्यावरणपूरकतेला प्रोत्साहन मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास त्यांची शाळा उपस्थितीची गोडी वाढेल आणि आठवड्याभराच्या शारीरिक, मानसिक त्रासातून मुक्तता मिळेल, असा या उपक्रमाचा उद्देश आहे.

### टँकरच्या स्फोटात चौघांचा मृत्यू

**उल्हासनगर** : येथील शहराच्या शहाड भागात असलेल्या सेंच्युरी रेयॉन या कंपनीत शनिवारी सकाळी टँकरच्या भीषण स्फोटात चार जणांचा मृत्यू झाला आहे तर चार जण जखमी झाले आहेत. मृत आणि जखमींची नावे समजू शकलेली नाहीत. दरम्यान, कंपनी प्रशासनाने मात्र दोनच जणांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले असून दोघांचा शोध सुरू असल्याचा दावा केला आहे. कंपनीत सकाळी ११.१५ वाजताच्या सुमारास बाहेरून आलेल्या टँकरची (एमएच ०४ जीसी २४८७) तपासणी सुरू होती. त्याचवेळी टँकरच्या टाकीचा भीषण स्फोट झाला.

### मदत करणाऱ्या पोलिसालाच कारने उडवले

**नवी मुंबई** : अपघातग्रस्ताला मदत करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला एका भरधाव कारने जोरदार धडक दिली. त्यात तो कर्मचारी जबर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. ही घटना शनिवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास पाम बीच येथील चाणक्य सिग्नलजवळ घडली. अप्पासाहेब पाटील आणि नितीन पाबळे हे वाहतूक पोलीस शिपाई नेहमीप्रमाणे पामबीच येथे गस्त घालत होते. त्यावेळी वाशीच्या दिशेने जात असताना त्यांना टी. एस. चाणक्य सिग्नलपासून काही अंतरावर दोन इसम रस्त्यावर पडलेल्या अवस्थेत त्यांना दिसले. त्यांच्या मदतीसाठी फोन करत असताना सीबीडी ते वाशीच्या दिशेने जाणाऱ्या एका पांढऱ्या रंगाच्या कारने ( एमएच ४३ बीयु २२०३) एका सुमो गाडीला जोरदार धडक दिली आणि लगेच काही अंतरावर उभ्या असलेल्या गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या गाडीला धडक दिली.

### बॅगेत चार दिवसांची मुलगी आढळून आली

**नवी मुंबई** : नवी मुंबईतील घणसोली सेक्टर ३ येथे एका बॅगेत चार दिवसांची मुलगी आढळून आली आहे. ही माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी सदर मुलीला ताब्यात घेत रुग्णालयात तपासणीसाठी घेऊन गेले. सध्या ही चिमुरडी एका बाळआश्रमात सोडण्यात आली आहे. ही घटना २२ सप्टेंबरला घडली असून पूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. घणसोली सेक्टर ३ येथील एका इमारतीत लक्ष्मी रुग्णालय आणि वन लाईट फिटनेस सेंटर दरम्यान एका ठिकाणी बेवारस अवस्थेत असलेल्या बॅगेतून एका तान्ह्या मुलीच्या रडण्याचा आवाज येत होता. सुरुवातीला कुठून आवाज येतोय हे समजले नाही. मात्र, व्यवस्थित ऐकले असता बॅगेतून आवाज येत असल्याचे उपस्थित लोकांच्या लक्षात आले. बॅग उघडून पाहिले असता त्यात चार दिवसांचे बाळ आढळून आले.

### इगतपुरीजवळील अपघातात दोघांचा मृत्यू

**नाशिक** : मुंबई ते नाशिक महामार्गावर रविवारी इगतपुरीजवळ मुंबईहून नाशिकच्या दिशेने एकाच मोटारसायकलवरुन तिघे जण जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने मोटारसायकल अडथळे तोडून पुढे जाणाऱ्या मालमोटारीवर पाठीमागून जाऊन आदळली. या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला.अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये समाधान भगत, सचिन पथवे (रा. धार्णोली, वैतरणा) यांचा समावेश आहे. भाऊ भगत (रा. खंबाळे) हे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक राजु सुर्वे, महामार्ग सुरक्षा पोलीस उपनिरीक्षक हरी राऊत, हवालदार विजय रुद्रे यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली.

## एनआयएची मोठी कारवाई

# खलिस्तानी दहशतवादी पन्नूची संपत्ती जप्त

सुराज्य/नवी दिल्ली

**भारत आणि कॅनडामधील तणावादरम्यान एनआयए (NIA) ने खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नूवर मोठी कारवाई केली आहे. एनआयएने बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायद्यांतर्गत पन्नूची चंदीगड आणि अमृतसरमधील मालमत्ता जप्त केली आहे. एकुणच एनआयएने दहशतवाद्यांची आर्थिक नस दाबली आहेत.**



एनआयएच्या या कारवाईने चवथाळलेल्या खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंतसिंह पन्नूने पुन्हा एकदा भारताविरोधात वक्तव्ये करण्यास सुरुवात केली आहे. पन्नू म्हणाला की, 'मालमत्ता जप्त करून मला शांत करता येणार नाही. आपल्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा पन्नूचा दावा आहे.'

#### पन्नू यांनी धमकी दिली होती

कॅनडाने भारताशी राजनैतिक वाद सुरू केल्यावर पन्नूनेही त्याला समर्थन दिले होते. यावेळी त्याने कॅनडामध्ये राहणाऱ्या हिंदूंना देश सोडण्याची धमकी दिली. एका व्हिडिओमध्ये तो म्हणाला की, 'इंडो-कॅनेडियन हिंदूंनो, तुम्ही कॅनडा आणि कॅनडाच्या राज्यघटनेशी असलेली निष्ठा नाकारली आहे. तुमचा देश भारत आहे. कॅनडा सोडून भारतात जा, अशीही धमकी त्याने दिली होती.'

**शेतजमीनही होणार जप्त**

चंदीगडमधील मालमत्ता जप्तीशी संबंधित नोटीस चिकटवण्यात आली होती. अशीच आणखी एक नोटीस पन्नू यांच्या खानकोट या मूळ गावातील शेतजमिनीवर लावण्यात आली होती.

खलिस्तान समर्थक दहशतवाद्यांविरोधात ही मोठी कारवाई मानली जात आहे. दहशतवादी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येत भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने केला आहे, अशा वेळी ही कारवाई झाली आहे. कॅनडाच्या पंतप्रधानांनी सांगितले की, निज्जरच्या हत्येत भारतीय गुप्तचर संस्थांचा हात होता. भारताने हे आरोप फेटाळून लावले आहेत.

**दहशतवादी कारवायांमध्ये सक्रीय**

निज्जरच्या मृत्यूनंतर संतप्त झालेल्या पन्नूने अलीकडेच हिंदू आणि भारतीयांना धमकावले होते. मात्र, एनआयएची ही कारवाई भारत सरकारची निराशा असल्याचे त्याने म्हटले आहे. तो म्हणाला की, भारताशी संघर्षात कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता हा मुद्दा नाही. आम्ही खलिस्तान निर्माण करू. २०२० मध्ये गृहमंत्रालयाने पन्नूला दहशतवादी घोषित केले होते. पन्नू तरुणांना भारताविरुद्ध दहशतवादासाठी भरती करत आहे. पन्नू हा हरदीपसिंग निज्जरसोबत जवळून काम करत होता.

# मुस्लीम आरक्षणासाठी पहिली बैठक मुंबईत



सुराज्य/मुंबई

## शिंदे-फडणवीसांच्या भूमिकेकडे सर्वांच्या नजरा

'स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत प्रत्येक मागासलेल्या आणि इतर समाजांमध्ये विकास झाल्याचे दिसून येत आहे. मात्र मुस्लीम समाज हा स्वातंत्र्याच्या काळात जेवढा विकसित होता. त्यापेक्षाही अधिक आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात मागासलेला झालेला आहे. देशाचा विकासाचा वेग वाढविण्यासाठी मुस्लीम समाजाला शैक्षणिक आरक्षण आवश्यक झालेले आहे. या मुस्लीम आरक्षणासाठी आगामी २१ ऑक्टोबरला पहिली मुस्लीम परिषदेचे आयोजन करण्यात आहे. आगामी काळात अकोला, धुळे, मालेगाव, कोल्हापूरसह राज्यात अन्य भागांत या परिषदेचे आयोजन केले जाणार आहे,' अशी माहिती मौलाना आझाद विचार मंचाचे अध्यक्ष व माजी खासदार हुसैन दलवाई यांनी पत्रकार परिषदेत दिली.


गांधी भवन येथे शनिवारी (२३ सप्टेंबर) आयोजिण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत हुसेन दलवाई यांच्यासह मुस्लीम रिझर्व्हेशन फ्रंटचे अजमल खान, सुभाष लोमटे, अन्वर राजन, अब्दुल शकुर सालार यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. मराठा समाजाला १६ आणि मुस्लीम समाजाला पाच टक्के आरक्षण देण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या काळात करण्यात आली. कोर्टात आरक्षण प्रकरण गेले होते. कोर्टाने मुस्लीम समाजाला शैक्षणिक क्षेत्रात आरक्षण मिळावे याबाबत अनुकूलता दर्शविली. अजूनही आरक्षण मिळालेले नाही. आरक्षणासाठी राज्यभरात विचार तयार व्हावा. सत्याग्रह किंवा चळवळ उभारून मुस्लीम समाजाला आरक्षण मिळावे. त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात तरतूद असावी. यासाठी राज्यभरात मुस्लीम परिषद आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**लोकसंख्येनुसार आरक्षण द्या**

मुस्लीम रिजर्व्हेशन फ्रंटचे अजमल खान यांनी 'मौलाना आझाद विचार मंचाच्या आरक्षणाच्या कामासोबत आपण असल्याची घोषणा केली. आता मुस्लीम समाजाला लोकसंख्येच्या आधारावर आरक्षण मिळावे,' अशीही मागणी केली.

# मुंबईतून २५० विमानांची उड्डाणे रद्द होणार

सुराज्य/मुंबई



छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील जवळपास २५० उड्डाणे १७ ऑक्टोबर रोजी रद्द होतील किंवा त्यांच्या वेळा बदलल्या जाणार आहेत. डागडुजीच्या कामासाठी विमानतळाची धावपट्टी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे १७ ऑक्टोबरला प्रवासाआधी प्रवाशांनी उड्डाणाची निश्चित माहिती घेणे आवश्यक असेल.

मुंबईचे विमानतळ सध्या देशातील सर्वाधिक प्रवासीसंख्या असलेले ठरत आहे. तसेच करोनाकाळाच्या आधीच्या स्थितीप्रमाणे दिवसाला ९००हून अधिक उड्डाणांसह देशातील सर्वाधिक व्यग्र विमानतळाच्या दिशेने त्याची वाटचाल आहे. या स्थितीत आगामी काळात डागडुजी १७ ऑक्टोबरला होणार आहे.

विमानतळाचे संचालन करणाऱ्या 'मिआल' कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, दरवर्षी पावसाळ्याआधी व पावसाळ्यानंतर धावपट्टीची डागडुजी व दुरुस्ती केली जाते. जेणेकरून पावसाळ्यात विमानतळावरून उड्डाणे सुव्यवस्थित होतील, असे नियोजन केले जाते. त्यादृष्टीने १८ ऑक्टोबर २०२२ रोजी ही डागडुजी करण्यात आली. त्यानंतर यावर्षी २ मे रोजीही अशी दुरुस्ती करण्यात आली.

सुराज्य/कोल्हापूर

# मर्डर आरोपीने बाहेर येताच बाटली फोडून भररस्त्यात सेलिब्रेशन

कोल्हापूर येथे खून आणि खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आणि जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या पाचगाव येथील आरोपी मिलिंद पाटील आणि गणेश कलगुटकी जामिनावर सुटल्यानंतर मिरवणूक काढल्याप्रकरणी पाच गावातील एकूण १६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये दोन्ही आरोपींसह इतर १३ ते १४ व्यक्तींचा समावेश असून करवीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस नाईक बालाजी हांगे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मिलिंद पाटील आणि गणेश कलगुटकी हे खून, खुनाचा प्रयत्न यांसह अन्य गुन्ह्यांत शिक्षा भोगत असताना मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. त्यामुळे दोघेही २१ सप्टेंबरला सायंकाळी साडेसातच्या सुमारास कळंबा मध्यवर्ती कारागृहातून जामिनावर सुटले. यानंतर मिलिंद पाटील आणि गणेश कलगुटकी यांच्यासह इतरांनी विना परवाना मिरवणूक काढून, हावभाव व असभ्य वर्तन करून, गोंगाट करून, भररस्त्यात बिअरची बाटली फोडून तसेच रस्त्यावरील ये-जा करणाऱ्या लोकांना रहदारीस अटकाव केला. त्यानुसार फिर्यादी यांनी सरकारतर्फे माहिती दिली.



## भावी जवानाला सायबर चोरट्याचा गंडा

**नाशिक** : पार्टटाइम ऑनलाइन व्यवसायासाठी क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक केल्यास नफा देण्याचे आमीष दाखवून तरुण इंजिनिअरची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे.

२४ लाख २५ हजार रुपयांचा गंडा घातल्याप्रकरणी संशयितांच्या टेलिग्राम आयडीसह खासगी बँकेच्या खातेक्रमांक धारकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंचवटी परिसरातील अयोध्यानगरी भागात राहणारा २६ वर्षीय तरुण पुणे शहरात काम करीत होता. या तरुणाचे वडील सैन्यदलात कार्यरत होते. त्यांच्या निधनामुळे अनुकंपा अंतर्गत तरुणाला सैन्यात नोकरी लागणार होती. तोपर्यंत व्यवसाय करण्याचा त्याचा मानस होता.

# शिक्षक बँकेच्या सभेत गदारोळ, अंडी फेक

**सांगली** : प्राथमिक शिक्षक बँकेच्या रविवारी झालेल्या वार्षिक सभेत अंडीफेक झाल्याने गदारोळ माजला. घोषणा-प्रतिघोषणांनी नेहमीप्रमाणे बँकेची सभा यंदाही गाजली. सत्ताधारी गटाच्या मनमानी कारभाराचा निषेध करीत विरोधी गटाने समांतर सभा घेत विषय पत्रिकेवरील सर्व विषय नामंजूर असल्याचे जाहीर केले, तर सभागृहात अंडीफेक करून गोंधळ माजवणाऱ्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आल्याचे अध्यक्ष विनायक शिंदे यांनी जाहीर केले.

गतवर्षी झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत पुरोगामी सेवा मंडळाचा पराभव करून स्वाभिमानी मंडळ सत्तेवर आले आहे. वार्षिक सर्वसाधारण सभा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली डेक्कन हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोप सुरू असल्याने सभा गाजणार असल्याचेच अंदाज व्यक्त केले जात होते. यानुसार मोठ्या पोलीस बंदोबस्तामध्ये सभा सुरू होताच, विरोधकांनी घोषणाबाजी करीत लाभांशापैकी १ कोटी ५४ लाखांचा निधी इमारतीसाठी वर्ग करण्यास विरोध दर्शवला.

## मालिकेत रंगणार अलौकिक विवाह सोहळा

**मुंबई** : केवळ महाराष्ट्रच नाही तर




अवघ्या भारतात ज्याची ग्रामदेवता म्हणून पूजा केली जाते, अशा कालभैरवाची आजवर पुढे न आलेली रंजक गोष्ट शेमारू मराठीबाणा वाहिनीवरील 'जोगेश्वरीचा पती भैरवनाथ' या मालिकेमधून प्रेक्षकांच्या भेटीस आली. मालिकेत आता जोगेश्वरीदेवी आणि भैरवनाथाचा विवाह सोहळा पार पडणार आहे. येत्या २५ ते २८ सप्टेंबर दरम्यान हे विवाह विशेष भाग रात्री ८.३० वा. शेमारु मराठीबाणा वाहिनीवरून बघायला मिळणार आहेत. 'जोगेश्वरीचा पती भैरवनाथ' ही मालिका आता अतिशय रंजक वळणावर आली आहे.

## स्वप्निल आणि प्रसाद 'जिलबी' चित्रपटात एकत्र

**मुंबई** : अभिनेता स्वप्नील जोशी आणि प्रसाद ओक यांनी आपल्या मिश्कील स्वभावाने मनोरंजनाचा



गोडवा कायमच वाढवला आहे. शूटिंग दरम्यान 'कुछ मिठा हो जाये' म्हणत या दोघांनी जिलबीवर येथेच्छ ताव मारला आणि हो... ही जिलबी' ते प्रेक्षकांनाही देणार आहेत.आनंद पंडित मोशन पिक्चर यांची निर्मिती असलेला 'जिलबी' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या व्हिडिओमध्ये चित्रपटाचे दिग्दर्शक नितीन कांबळे ही या दोघांची फिरकी घेतायेत. स्वप्निल आणि प्रसाद हे दोघंही 'जिलबी' चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र काम करताना दिसणार आहेत.

## वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना देणार बीएलएसचे प्रशिक्षण

**पुणे** : पुण्यातील मणिपाल हॉस्पिटलने पुणे वाहतूक पोलिसांबरोबर सहकार्य करुन संयुक्त विद्यमाने पुणे वाहतूक पोलिसांना बेसिक लाईफ सपोर्ट स्कील्सचे प्रशिक्षण १००० वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना देण्याच्या उपक्रमाची सुरुवात केली आहे. शहरात एकूण २३ ठिकाणी अपघाती ब्लॅक स्पॉट्स असून २०२३ च्या पहिल्या सहा महिन्यांत त्या ठिकाणांवर ६३८ अपघात झाले व त्यापैकी १९२ जीवघेणी अपघात होऊन त्यात २०२ जणांना जीव गमवावा लागला. या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट्य म्हणजे पुण्यातील वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन तत्काळ प्रतिसाद देणे शक्य होईल. कारण अपघात झाल्यावर आपात्कालीन स्थितीत सर्वप्रथम पोहोचणारे हे वाहतूक पोलीस कर्मचारी असतात. यावेळी हॉस्पिटल्सच्या अद्ययावत अशा कार्डिक रुग्णवाहिकांचे अनावरण करण्यात आले.




# मध्यरात्री विजांचे तांडव

## नागपूरकरांना धडकी भरली

सुराज्य/नागपूर

महालक्ष्मीच्या जेवणाचा दिवस आणि पाऊस हे समीकरण नागपूरकरांना नवीन नाही. महालक्ष्म्यांना पाऊस येतोच, असे आपण हमखास म्हणत असतो. झालेही तसेच. शुक्रवारी सकाळी पाऊस झाला. दुपारनंतर पावसाने उसंत घेतली. महालक्ष्म्यांचे जेवण रात्री सुरळीत पार पडले. मात्र, मध्यरात्री १.३० वाजतादरम्यान विजांचे तांडव सुरू झाले. काहीच मिनिटांत मुसळधारेने शहरावर जणू आक्रमण केले. शनिवारी सकाळपर्यंत सुरू असलेला हा पावसाचा जीवघेणा खेळ पाहता ही ढगफुटी तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित झाला.

मध्यरात्री सुरू झालेल्या या जलप्रलयाने नागपूरकर झोपेतून खडबडून जागे झाले. धडकी भरवणारा कडकडाट आणि दिसणारा लखलखाट पाहून कुठेतरी वीज कोसळली असणार, असा अंदाज अनेकांनी व्यक्त केला. मात्र, थोड्या वेळात ओसरेल पाऊस, म्हणत झोपी गेलेल्या नागरिकांना सकाळी 'पाऊस आपल्या दारी'चा प्रत्यय आला.

'न भुतो' अशा स्वरूपाच्या जलप्रलयाने रस्त्यांना नदीचे स्वरूप आले, घराघरांत पाणी शिरले, दुचाकी-चारचाकी वाहने शोधावी लागली, बेसमेंटमध्ये जलतरण तलाव तयार झालेत, सखोल वस्त्यांमध्ये बोटी लावून लोकांना घरातून बाहेर काढावे लागले.

कायम रहदारीचा असणाऱ्या सीताबर्डी आणि पंचशील चौकात कधी नव्हे इतके पाणी साचले. या दोन्ही चौकांत राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या सहकार्याने लोकांना हलविण्यात आले. विदर्भ साहित्य संघाच्या संकुलातील तळमजल्यावरील दुकानांमध्ये पाणी शिरल्याने लाखोंचे नुकसान झाले.

डागा लेआउट, कॉर्पोरेशन कॉलनी येथे अंबाझरी तलावाच्या ओव्हरफ्लोमुळे घरातील फर्निचर, इलेक्ट्रॉनिक्सची उपकरणे, दुचाकी-चारचाकी गाड्यांचे मोठे नुकसान झाले. धंतोली परिसरातील तळमजल्यावरील कम्प्युटर आणि मोबाइलच्या दुकानांमध्ये पाणी शिरल्यामुळे कोट्यवधींचे व्यावसायिक नुकसान व्यापाऱ्यांना सोसावे लागणार आहे.

झाशी राणी चौक ते सीताबर्डी मेट्रो इंटरचेंज जाणाऱ्या मार्गावरून नदीसदृश चित्र होते. नागपूरच्या आरबीआय क्वार्टरमध्येदेखील पाणी घुसले होते.

गांधीनगर येथील नाग नदीची सुरक्षा भिंत कोसळल्याने अनेक घरांत पाणी घुसले. यामुळे नागरिकांनी सुरक्षित स्थळी असरा घेतला. धीरन कन्या शाळेजवळील नाला खचला, रस्तादेखील वाहून गेला.

### नाग नदीला पूर, मोरभवन पाण्यात

शहरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने नाग नदीला पूर आला. काही भागांत नाग नदीकाठच्या घरांमध्ये पुराचे पाणी शिरले. मध्यरात्री नागपूर शहराला मुसळधार पावसाने चांगलेच झोडपले. वाडी येथील हजारी यांच्या घराची सुरक्षाभिंत जमीनदोस्त झाली. सीताबर्डी येथील मोरभवन बस स्थानकात अडकलेल्या बसचालक-वाहकांना सुरक्षितस्थळी पोहोचविण्यात आले. मोरभवन येथे सुमारे १० ते १२ बस पूर्णपणे पाण्याखाली होत्या.

पावनं ऽऽ रामराम



काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# होय, 'लॉटरी' लागू शकते!



**सोलापूर लोकसभा मतदार संघाच्या आगामी निवडणुकीतही भाजप व काँग्रेस यांच्यात 'काटे की टक्कर' होणार, यात शंकाच नाही. त्यादृष्टीनेच या दोनही पक्षांकडून रणनीती आखली जात आहे. २०१४ आणि २०१९ अशा दोन निवडणुकांमध्ये काँग्रेसचे सुशीलकुमार शिंदे यांचा पराभव झाला. त्यामुळे पुन्हा निवडणुकीच्या निखाऱ्यावर हात ठेवण्याची शिंदेंची मानसिकता नाही. पण या मतदार संघात आपले वर्चस्व पाहिजेच,ही त्यांची इच्छा लपून राहिलेली नाही. त्यासाठीच की काय? त्यांनी आपली कन्या आ.प्रणिती हीच सोलापूर लोकसभा लढवेल,अशी घोषणा करून टाकली. आ.प्रणिती ह्या लागलीच तयारीलाही लागल्या आहेत पण समोरच्या भाजपकडून अजूनही उमेदवार म्हणून कुणाचा चेहरा समोर आणलेला गेलेला नाही. त्यामुळे भाजपचे कार्यकर्ते संभ्रमात आहेत. एकदा का चेहरा समोर आणला की, आम्ही कामाला लागू,असे भाजप कार्यकर्ते बोलत आहेत.**

**पुरुषोत्तम कुलकर्णी**

सध्या भाजपचे डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामी हे खासदार आहेत. राजकीय रितीरिवाजानुसार त्यांनाच दुसऱ्यांदा उमेदवारी देता येईल पण महास्वामीजी जात प्रमाणपत्राच्या वादात अडकले आहेत. त्याचा फायनल निकाल कधी लागेल हे आतातरी सांगता येणार नाही. निवडणूक लागण्याच्या आत महास्वामींना बेडा जंगमच्या दाखल्याबाबत सत्य समोर आणावे लागेल. अन्यथा भाजपश्रेष्ठी वेगळाच विचार करणार असे दिसते. कारण दूध पोळल्यानंतर ताकही फुंकून प्यावे लागते, असे म्हणतात, त्याप्रमाणे भाजपश्रेष्ठी महास्वामींच्या बाबतीत घाई करतील,असे वाटत नाही. पुढेही तिच तिच कटकट असता कामा नये,असे भाजपश्रेष्ठींना वाटत असणार. त्यामुळे भाजपच्या चेहऱ्याबाबत अजूनही दोलायमय स्थिती आहे. शिंदे फॅमिलीला फाईट करण्यासारखा तगडा उमेदवार भाजपला शोधावा लागणार आहे. अनुसूचित जातीमधला ताकतवान स्थानिक उमेदवार या पक्षाकडे नाही, हे वास्तव आहे. मग बाहेरून नवा उमेदवार आणणार काय? अशीही चर्चा झडत आहे. त्यासाठीचे काही प्रसंगांकडे बोट दाखवले जात आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपचे निष्ठावंत असणारे नेते अमर साबळे यांना सोलापूर लोकसभा मतदार संघाचे समन्वयक म्हणून एक मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यानंतर त्यांनी लागलीच सोलापूरचा दौरा करून भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा कौल जाणून घेतला. बैठकीनंतर पत्रकारांनी त्यांना छेडले. त्यांच्या मनातील भावनांना हात घातला. आपण सोलापूरसाठी इच्छुक आहात काय? असा प्रश्न विचारला. अरे महास्वामी असताना मी कशाला? असा प्रतिप्रश्न साबळेंनी केला. पण पक्षश्रेष्ठींनी सांगितल्यानंतर त्यांना उभे राहून निवडणूक लढवावीच लागेल. निवडणुकीच्या तोंडावर साबळेंना समन्वयक पदाची धुरा देणे म्हणजे पक्षश्रेष्ठींचा विचार त्यांच्यासाठी अनुकूल असावा,असा निष्कर्ष समोर आला आहे.साबळे यांचे अष्टपैलू व्यक्तीमत्व आहे. त्यांचा पिंड पत्रकारितेचा आहे. विविध विषयांचा अभ्यास आणि वक्तृत्व अमोघ आहे. दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे ते विश्वासू सहकारी. भाजपच्या मागासवर्गीय विभागाचे माजी प्रदेशाध्यक्ष अशी ओळख असलेल्या साबळेंना नाव चर्चेत नसतानाही राज्यसभेसाठी 'लॉटरी' लागली होती. त्यावेळी सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या. मुंडे यांच्या निधनानंतर राजकीय अस्तित्वच धोक्यात आलेल्या साबळे यांचे भाजपने खासदारकी देऊन पुनर्वसन केले आहे. प्रदेशाध्यक्षपदासाठी 'मराठा कार्ड' वापरल्यानंतर राज्यसभेसाठी मागासवर्गीय चेहरा दिल्याचा युक्तिवाद पक्षातर्फे करण्यात आला. राजकीय डावपेचात कमी पडल्याने पिंपरी विधानसभेची आमदारकी हुकलेल्या साबळे यांना न मागता राज्यसभेची खासदारकी मिळाली.तशीच लॉटरी सोलापूरसाठीही लागू शकते,असे राजकीय जाणकारांना वाटते.

### निश्चित निवडून येतील

साबळे हे मूळचे बारामतीचे. त्यांचा सोलापूशी घनिष्ठ संबंध आहे. पंढरपूर लोकसभा मतदार संघातही समन्वयक म्हणून पक्षाने त्यांच्यावर जबाबदारी सोपवली होती. २०१९च्या निवडणुकीत साबळे यांच्या नावाची चर्चा होती. त्या दृष्टीने सोलापुरात साबळे यांचा अधिकाधिक संपर्क कसा वाढेल, या दृष्टीने नियोजनबद्धरित्या आखणी केली गेली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपने आदेश दिल्यास निवडणूक लढवण्याची तयारी असल्याचे साबळे यांनी म्हटले होते परंतु स्थानिक नेत्यांनी ऐनवेळी महास्वामींचा चेहरा पुढे आणला.सोलापूरच्या मतदारांनी महास्वामींना भरभरून मतदान केले.पक्षश्रेष्ठींनी साबळेंचा चेहरा समोर आणला तर आम्ही कामाला लागू.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाहून मतदार पुन्हा भाजपलाच कौल देतील आणि साबळे निवडून येतील,असा विश्वास कार्यकर्त्यांमधून व्यक्त केला जात आहे.

### पद्धतशीर गेम केला

निवडणुकीच्या तोंडावर मुंडे यांचे निधन झाल्याने साबळे यांचा राजकारणातील भक्कम आधार गेला आणि त्यांची सर्व गणिते कोलमडली. त्यानंतरच्या पक्षांतर्गत घडामोडीत साबळेंचा पत्ता कापण्यात आला. मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतील तत्कालीन दावेदार पंकजा मुंडे यांच्याच पाठीशी साबळे राहतील, या शक्यतेने भाजप नेत्यांनी रिपाइंसाठी पिंपरीची जागा सोडून त्यांचा राजकीय 'गेम' केल्याचे बोलले जाते. कोणतीही चर्चा नसताना ऐनवेळी राज्यसभेसाठी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. राष्ट्रीय उपाध्यक्ष विनय सहस्त्रबुध्दे, दिल्लीतील कार्यालयमंत्री श्याम जाजू, राज्यातील कोषाध्यक्षा शायना एन.सी अशी वजनदार नावे चर्चेत असताना नाट्यमय घडामोडीनंतर मागासवर्गीय चेहरा म्हणून साबळेंच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

### गुरूसाठी पत्रकारिता सोडली

मुंडे यांना गुरूस्थानी मानणाऱ्या साबळे यांनी मुंडे यांच्यासाठीच पत्रकारिता सोडून राजकारणात उडी घेतली. विश्वासू असल्याने गोपीनाथ मुंडे यांनी स्वत:च्या विधानसभा व नंतर लोकसभा मतदारसंघातील प्रचारयंत्रणा त्यांच्याकडे दिली होती. २००९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी साबळे पिंपरीत राहण्यासाठी आले. पिंपरी विधानसभा मतदारसंघ मागासवर्गीयांसाठी राखीव झाला होता. त्यामुळे आमदारकीचे गणित डोळ्यासमोर ठेवून मुंडेंनी त्यांना पिंपरीत आणले. स्थानिक पातळीवर तीव्र विरोध असतानाही मुंडेंनी त्यांना पक्षाची उमेदवारी मिळवून दिली. अटीतटीच्या लढतीत राष्ट्रवादीचे अण्णा बनसोडे यांच्याकडून ते पराभूत झाले. मात्र, त्यांना मिळालेल्या ५१ हजार मतांची नोंद पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर घेण्यात आली. साबळे पिंपरीतच स्थायिक झाले.

**भारतीय जनता पार्टीची जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली असून माढा तालुक्यातील अनेक पदाधिकाऱ्यांना या जिल्हा कार्यकारणीत पदे देण्यात आले असल्याने यांना काम करण्याची संधी मिळाली आहे. तर माढा तालुका भाजपाची नूतन कार्यकारिणी जाहीर होण्याची शक्यता असून इच्छुकांनी हालचाली वाढवल्या आहेत.**

# माढा तालुका भाजपा कार्यकारिणीत बदल होण्याची शक्यता

**उल्हास पाटील**

माढा तालुक्यामध्ये भारतीय जनता पार्टीची अपेक्षित अशी ताकद वाढली नाही. याच बरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजितदादा पवार हे भाजपा सोबत जाऊन सत्तेत सहभागी झाले. त्यानंतर माढ्याचे आमदार बबनराव शिंदे व करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे अजितदादा पवार यांच्यासोबत गेल्यामुळे माढा लोकसभेचे भाजपाचे खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्यासोबत असल्याचे जाहीर केले.
यामुळे माढा तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी शांत झाल्याचे बोलले जात आहे.
यामुळे माढा तालुक्यात भारतीय जनता पार्टीची नूतन कार्यकारणी जाहीर होण्याची शक्यता आहे. यासाठी भाजपचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर व जिल्हाध्यक्ष केदार व करमाळ्याचे तालुकाध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांमध्ये कुर्डूवाडी येथील शासकीय विश्रामगृहात बंद खोलीत एक तास चर्चा झाली यामध्ये अनेक विषयाबाबत चर्चा झाली आहे.
माढा तालुक्याचे आमदार बबनराव शिंदे यांचे तालुक्यात वर्चस्व आहे तेही भाजप सोबत आल्यामुळे भाजपा पदाधिकाऱ्यांची अडचण निर्माण झाल्याचे चर्चा आहे.
यामुळे लवकरच भारतीय जनता पार्टीची माढा तालुका कार्यकारणी बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.
यासाठी इच्छुकांनी आपापल्या परीने फिल्डिंग लावण्याची सुरुवात केली आहे. मात्र नूतन कार्यकारणी बदलूनही माढा तालुक्यात भारतीय जनता पार्टीची ताकद वाढेल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### कार्यकर्त्यांपेक्षा पदाधिकारीच उदंड

भाजपने यापूर्वीही विविध आघाड्या ,सेल उघडून पदांची खैरात वाटली. पण एकाही पदाधिकाऱ्याने समाधानकारक असे काम केले नाही. कार्यकर्त्यांपेक्षा पदाधिकारीच उदंड झाले असल्याचे दिसत आहेत. नूतन पदाधिकारी तरी भाजपला तसेच नागरी प्रश्नांना न्याय देतील का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# एकीकडे बापूंचा विकासकामांवर जोर दुसरीकडे काँग्रेसमधील दुफळी सर्वांसमोर

**विधानसभा निवडणूक जसजशी जवळ येईल तसतशा दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये राजकीय घडामोडींना वेग येऊ लागला आहे. सर्वच इच्छुक उमेदवार दक्षिण विधानसभा मतदारसंघामध्ये या ना त्या माध्यमातून आपला ठसा उमटविण्याचा प्रयत्न करत आहेत. विद्यमान आमदार सुभाष देशमुख मतदारसंघात कोट्यवधीचा निधी आणत पुन्हा एकदा आपला दावा मजबूत करताना दिसत आहेत. तर दुसरीकडे काँग्रेसमध्ये असणारा विसंवाद पुन्हा एकदा आमदार सुभाष देशमुख यांच्या पथ्यावर पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**



**अजित उंब्रजकर**

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असणारा दक्षिण तालुका सुभाष देशमुख यांनी उद्ध्वस्त करून भाजपची विजयी पताका फडकवली. २०१४ मध्ये आमदार सुभाष देशमुख दक्षिण तालुक्यात प्रथम आमदार झाले. त्यांनी तत्कालीन काँग्रेसचे आमदार दिलीप माने यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. त्यावेळी माने यांना काँग्रेसमधूनच त्यांना प्रचंड विरोध झाला. त्यावेळी सुरेश हसापुरे हे अपक्ष तर बाळासाहेब शेळके यांनी बंडखोरी करत राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवली. मतांच्या फुटीचा फायदा सुभाष देशमुख यांना झाला. २०१९ मध्ये दिलीप माने यांनी शहर मध्यचा रस्ता धरला. त्यामुळे या मतदारसंघातून काँग्रेसकडून बाबा मिस्त्री यांना उमेदवारी देण्यात आली. त्यावेळी काँग्रेस मधील अनेक नेत्यांनी छुप्या पद्धतीने आमदार सुभाष देशमुख यांना मदत केली. त्यामुळे सुभाष देशमुख यांचा सलग दुसऱ्यांदा विजय झाला मात्र यावेळेस बाबा मिस्त्री यांनी मिळवलेली मते मात्र चर्चेचा विषय ठरली. आता २०२४ विधानसभेची निवडणूक येत आहे. भाजपकडून सध्यातरी आमदार सुभाष देशमुख यांचेच नाव पुन्हा एकदा चर्चेत आहे. राज्यात भाजप विरोधात महाआघाडी झाली आहे. ही महाआघाडी शेवटपर्यंत टिकल्यास दक्षिण विधानसभा मतदारसंघ काँग्रेसच्या वाटणीला येणार आहे. काँग्रेसकडून येथे सध्या सुरेश हसापुरे, विजयकुमार हत्तुरे यांच्यासह जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील इच्छुक आहेत. कर्नाटकातील विजयानंतर आणि चिमणी पाडकाम प्रकरणानंतर दक्षिण तालुक्यात काँग्रेसला चांगले दिवस येतील, अशी चर्चा असताना पुन्हा एकदा पक्षातील वादविवाद चव्हाट्यावर आल्याने काँग्रेस हा मतदारसंघ हातचा घालवणार का अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांनी नुकतेच दक्षिण तालुक्यात जनसंवाद यात्रा काढली या यात्रेला सुरेश हसापुरे यांचे समर्थक गैरहजर राहिले. त्यामुळे हसापुरे आणि मोहिते पाटील यांच्यातील वाद सर्वांसमोर आले. दुसरीकडे विजयकुमार हत्तुरे आणि सुरेश हासापुरे यांच्यातही फारसे पटत नसल्याचे बोलले जाते. हीच काँग्रेस मधील दुफळी पुन्हा एकदा आमदार सुभाष देशमुख यांच्या पथ्यावर पडत आहे. दुसरीकडे आमदार सुभाष देशमुख इतर कोणताही विचार न करता दक्षिण तालुक्यात जास्तीत जास्त निधी कसा आणता येईल याकडे भर देत आहेत. आत्तापर्यंत त्यांनी भाजप सरकार आल्यापासून जवळपास २०० कोटींपेक्षा जास्त निधी मतदार संघात आणला आहे ही त्यांची जमेची बाजू ठरणार आहे.

नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये काही ग्रामपंचायती भाजपच्या हातून निसटल्या होत्या. त्या तांत्रिक मुद्द्यावर देशमुखांनी परत आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळविले आहे. यामध्ये भंडारकवठे, अंत्रोळी या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. देशमुखांच्या रडारवर आणखीन काही ग्रामपंचायती असल्याचे बोलले जात आह. त्यादेखील ताब्यात घेण्यासाठी त्यांनी व्यूहरचना आखली आहे. या माध्यमातून आमदार देशमुख यांनी दक्षिण विधानसभा मतदारसंघावर आपली पकड अधिक कशी मजबूत राहील, यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहेत.

### दिलीप माने यांच्यामुळे येणार रंगत



गेल्या वेळेस शहर मध्यमधून निवडणूक लढवून आपली चूक झाली यापुढे आपण दक्षिण मतदारसंघातूनच निवडणूक लढवणार असे दिलीप माने वारंवार सांगत आहेत त्यामुळे यंदा आमदार सुभाष देशमुख यांच्यापुढे माजी आमदार दिलीप माने यांचे मोठे आव्हान असणार आहे दिलीप माने कोणत्या पक्षात जाणार ऐनवेळी ते काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे एकंदरीत दिलीप माने यांच्या भूमिकेमुळे दक्षिण मतदार संघात रंगत येणार हेही तितकेच खरे बापूंना विजयाच्या हॅट्रिक पासून दिलीप माने रोखणार का याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

# सोपल कोणाच्या राष्ट्रवादीत? साहेबांच्या की दादांच्या?

**जुलै महिन्यात राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारा शपथविधी झाला. राष्ट्रवादीचे बलाढ्य नेते व तत्कालीन विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी इतर ९ आमदारांसह उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. राष्ट्रवादीमध्ये फूट पडली हे उघड झाले. त्यामुळे आता कार्यकर्ते आजही संभ्रमात आहेत. राष्ट्रवादीमध्ये निर्माण झालेल्या या गटबाजीचे पडसाद राज्यामध्ये असलेल्या राष्ट्रवादीच्या प्रभावाखालील प्रत्येक मतदार संघात उमटत आहेत. बार्शी मतदारसंघातही अशीच परिस्थिती आहे. बार्शी तालुक्याच्या राजकारणात सक्रिय असणाऱ्या माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या राजकीय भुमिकेकडे तालुकावासियांचे लक्ष आहे.**

**सचिन अपसिंगकर**

लोकसभेच्या निवडणूका अवघ्या तीन महिन्यांवर आल्या आहेत. त्याचवेळी राष्ट्रात एक निवडणूक हे सुत्र डोळ्यासमोर ठेवुन विधानसभेच्या निवडणूकाही होतील असा मतप्रवाह आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका सुध्दा निवडणूक आयोगाला घ्याव्याच लागणार आहेत कारण कालावधी संपुन जवळपास दिड ते दोन वर्षे उलटलेल्या अनेक महानगरपालिका व



इतर संस्था आहेत. या पार्श्वभूमीवर बार्शी शहरातील नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या जागा आणि महत्वाचे सत्ताकेंद्र मानले जाणाऱ्या बाजार समितीची निवडणूकसुध्दा घ्यावीच लागणार आहे. या निवडणूकांची तयारी बार्शी तालुक्यातील सोपल, राऊत व बारबोले गट उघड व भूमिगत पध्दतीने करताना दिसतो आहे. सध्या आमदार राऊत हे पूर्णपणे भाजपाकडे झुकलेले असून त्यांनी या निवडणुका भाजपाकडूनच लढविणार असल्याचे जाहिर केले आहे. बारबोले गटाने राष्ट्रवादीतील शरद पवार गटासोबत जाण्याचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभुमीवर गेली साडेचार दशके राज्याच्या व पर्यायाने बार्शी तालुक्याच्या राजकारणात सक्रिय असणाऱ्या माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या राजकीय भूमिकेकडे तालुकावासियांचे लक्ष आहे. राऊत यांना आता सध्या तरी सोपल हेच मोठे विरोधक आहेत. मिरगणेंनी राजकीय अलिप्ततावाद स्विकारलेला आहे. आंधळकरांनी शिवसेनेच्या शिंदे गटात जाण्याचा निर्णय घेतला आहे. सोपल सध्या शिवसेनेच्या ठाकरे गटातच आहेत. सोपल यांनी शिवसेनेत पडलेल्या फुटीवर आजपर्यंत कोणतेही भाष्य केलेले नाही. तसेच राष्ट्रवादीमध्ये झालेल्या बंडानंतरही त्यांनी कोणतेही मत प्रदर्शीत केलेले नाही. पण सोपलांना पराभवाचे कितीही झटके बसले तरी त्यांची बौध्दीक, वैचारिक ताकद आणि लोकसंग्रह व त्यांच्यावर प्रेम करणारा कार्यकर्त्यांचा वर्ग या तालुक्यात मोठा आहे. त्यामुळे सोपल साहेबांसोबत जाणार कि दादांकडे झुकणार कि ठाकरे गटातच राहणार याबाबत उत्सुकता आहेच.

### महाविकास आघाडीची मोट बांधणार का?

सोपल यांना आगामी काळात अजितदादांबरोबर त्यांचे कितीही घनिष्ठ संबंध असले तरी राजकीय दृष्टयात्यांना साथ देणे अडचणीचे ठरणार आहेत. त्यामुळे सोपल शरद पवार गटाकडे झुकतील किंवा ठाकरे गटातच राहून बार्शी तालुक्यात महाविकास आघाडीची मोट बांधतील असा अंदाज आहे. पाहुयात सोपल साहेबांच्या मनात आहे तरी काय ?

# म्हेत्रेंच्या संवाद यात्रेने अक्कलकोटमध्ये उडणार राजकीय धुराळा

**अक्कलकोट मतदारसंघात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या विकास कामाचा सपाटा सुरु असून तालुक्यातील सर्वच भागात निधीच्या माध्यमातून विकासकामे जोमाने सुरु आहेत. सलग दुसऱ्यांदा विजयी होण्याचा मानस आ. कल्याणशेट्टी यांनी केला आहे तर दुसरीकडे माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे हे कल्याणशेट्टी यांच्या घोडदौडीला ब्रेक लावण्याची तयारी करत आहेत. म्हेत्रे हे १ ऑक्टोंबरपासून जनसंवाद यात्रा' काढणार असल्याने तालुकावासियांना निवडणुकापूर्वीच राजकीय धुराळा पहायला मिळणार आहे.**

**रविकांत धनशेट्टी**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अखंड गतीतून सार्थकता' या ब्रिद वाक्याप्रमाणे आपल्या विकास कामातील सातत्य अखंड ठेवताना दिसत आहेत. विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक वाड्या, वस्त्या, तांड्यातील जनतेकरिता वेळ देत दर सोमवारी जनता दरबारच्या माध्यमातून नागरिकांच्या अडी-अडचणी सोडवित आहेत. तालुक्यातील प्रत्येक गावात विकास कामाच्या माध्यमातून वीज, पाणी, रस्ते, समाज मंदिर, वॉल कंपाऊंड, पेव्हर ब्लॉक बसविणे आदीच्या माध्यमातून गावाचा विकास साधत आहेत. विकास कामात दादांनी कधीच राजकारण न करता प्रत्येक ग्रामपंचायतीला कोट्यावधी रुपयाचा निधी देवून कायापालट करीत आहेत.

आमदार कल्याणशेट्टी यांच्यावर भाजपा जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी वाढल्याने तालुक्याबरोबरच जिल्ह्यातील इतर तालुक्यात देखील भाजपाचे बळ वाढविण्याचे काम सध्या जोमाने सुरु आहे. आगामी स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीत सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकाविण्याचे चंगच बांधल्याने जिल्ह्यात दादांची क्रेझ वाढली आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या अभेद्य युतीने अक्कलकोट व



दुधनी बाजार समिती म्हेत्रेंच्या ताब्यातून हस्तगत करीत भाजपाने झेंडा फडकाविला. दुसरीकडे सोलापूर जिल्ह्यातील खास आमदार म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दादांनाच पंसती दिली आहे. जिल्ह्याचे महत्वाचे निर्णय फडणवीस यांनी दादांवरच सोपवले आहेत. त्यामुळे त्यांचा विश्वास सार्थ ठरवण्याचे मोठे आव्हान आता दादांसमोर असणार आहे.

दुसरीकडे बाजार समितीच्या मोठ्या पराजयातून सावरत काँग्रेस पक्षाच्या बळकटीकरिता माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे सरसावले आहेत. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करीत समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न सिध्दाराम म्हेत्रे यांनी केला आहे. मात्र सिध्दाराम म्हेत्रे यांच्या सोबत असलेली फळी ही पूर्णत: विस्कटली असल्याने आगामी काळातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व विधानसभेत काँग्रेस पक्षासह सिध्दाराम म्हेत्रे यांना जीवाचे रान करावे लागणार आहे.

### संवादयात्रेद्वारे शक्तीप्रदर्शन

आता १ ऑक्टोंबर २०२३ रोजी सिध्दाराम म्हेत्रे हे जनसंवाद यात्रा' काढुन तालुक्यातील गाव, वाडी, वस्त्या, तांडे पिंजून काढणार आहेत. ही संवाद यात्रा म्हणजे म्हेत्रे यांचे शक्तीप्रदर्शन मानले जात आहे. त्यामुळे आता निवडणुकीपूर्वीच अक्कलकोट तालुक्यात राजकीय धुराळा पहायला मिळणार आहे.